छात्र प्रबोधन

सौर चैत्र, शके १९३४
वर्ष १२ अंक ७

वासंतिक विशेषांक

मूल्य रुपये वीस

ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी, कृतिशीलता जोपासणारे मासिक !

सुंदर वळण... 'क्लिक' करण्यापूर्वी (पान क्र. १२)

तुम्हा मुलामुलींचे संपादक मंडळ

तुमच्यातल्या लेखक-कवी-चित्रकार-संपादक यांना जागं करण्याची अभिनव संधी 'छात्र प्रबोधन' तुम्हाला उपलब्ध करून देत आहे. आत्तापर्यंत शेकडो वेळा 'छा.प्र.'चा अंक तुम्ही पाहिला आहे, हाताळला आहे, वाचला आहे. तुम्हाला आवडलेल्या कथा-कवितांना मनापासून दादही दिली आहे. पण आपल्या हातात येणारं मासिक मुळात बनतं कसं? काय काय आणि कशाप्रकारे त्यासाठी विचार करायचा असतो? वेळेचं नियोजन कसं करायचं असतं? धमाल वाद-विवाद - चर्चा; लेआवुट-प्रुफ रिडिंग-एडिटिंग यांसारख्या नव्या शब्दांमुळे आलेलं सुरुवातीचं गोंधळलेपण; वेळेचं गणित सांभाळताना वाटणारी धाकधूक यावर मात करून आपण तयार केलेला अंक पाहण्यातला आनंद 'छाप्र' त आल्याशिवाय, संपादक मंडळाचं काम केल्याशिवाय कळणार कसा? म्हणूनच तुमची दहावीची परीक्षा झाली की असा हटके अनुभव घ्यायला अवश्य या. त्यासाठी तुम्ही वाचलेल्या एखाद्या पुस्तकावर परीक्षण, एखादा स्वरचित निबंध, कविता, लेख आमच्यापर्यंत जरूर पोहोचवा. शिवाय तुम्हाला या विद्यार्थी संपादक मंडळात काम करायला का आवडेल हेही आमच्यापर्यंत जरूर पोहोचवा.

'ज्ञान प्रबोधिनीद्वारा सुट्टीतील उपक्रम-शिबिरे' (माहितीसाठी पान क्र. ४० पाहा.)

आपल्याला काय आवडतंय, काय काय करून बघायला आवडेल, आपल्यातल्या क्षमता कुठल्या, मर्यादा कुठल्या? हे सगळं जाणून घ्यायची, अनुभवसंपन्न होण्याची संधी 'ज्ञान प्रबोधिनी'च्या सुट्टीतल्या शिबिरांमधून आणि उपक्रमांमधून तुम्हाला मिळेल. या शिबिर-उपक्रमांत जरूर सहभागी व्हा.

महाविद्यालयीन युवक-युवतींसाठी मे महिन्यात

'नेतृत्व संवर्धन शिबिर'

अधिक तपशील पान ४० वर पाहा आणि त्वरित नावनोंदणी करा !

छात्र प्रबोधन

सौर चैत्र, शके १९३४। वर्ष १२ अंक ७

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४ (जुलै – ऑगस्ट १९९२) २३७ वा अंक, वर्ष २० अंक ९

प्रकाशन दिनांक – १२ चैत्र, शके १९३४/१ एप्रिल २०१२

ॐ

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

वासंतिक विशेषांक ● अंतरंग ● वासंतिक विशेषांक

२. **संवाद** – महेन्द्र सेठिया

३. कथा... **आभाळभैरी** – म. वि. कोल्हटकर

६. कविता... **खूप हट्ट केल्यावर** – आसावरी काकडे

७. अनुभवपर... **अपयशातून यशाकडे** – डॉ. विनया जंगले

१३. **विज्ञान शिबिरे कशी घ्याल?** – नचिकेत नित्सुरे

१७. **स्वामी विवेकानंद : भारतीय युवकाचा आविष्कार** – विवेक घळसासी

२१. चित्रगोष्टी...५ – **स्थिरचित्र – २** – चित्रा वैद्य

२३. ललित... **सोन्नं माझ्या मनातलं...** – जयश्री काटीकर

२८. कविता... **चित्र काढूया नवे नवे** – प्रभाकर साळेगावकर

२९. कथा... **सैतानाचे बाळ** – नीला खेर

३१. उजळती वाट...– ६ **सद्गुरूसेवा** – डॉ. स्वर्णलता भिशीकर

३४. कविता... **शुभास्ते पन्थान: सन्तु।** – डॉ. भाग्यश्री हर्षे

३५. ललित... **सुट्टीतील शाळा** – फ. मुं. शिंदे

३६. प्रकल्पाची कमाल, शिकण्यातली धमाल... ७ **प्रकल्पाचे मूल्यमापन** – विवेक पोंक्षे

३९. **‘तुम्हीच संपादक व्हा!’ स्पर्धा निर्णय**

४०. **ज्ञान प्रबोधिनीद्वारा सुट्टीतील शिबिरे**

याशिवाय – सादरीकरण स्पर्धा निर्णय (५), रॉक ॲण्ड पेपर स्कल्पचर (६), फ्रेम, ‘क्लिक’ करण्यापूर्वी, अभिनंदन (१२), ग्रामीण मेळावे (१६), ७ एप्रिल–जागतिक आरोग्यदिन, ...वाचाल तर वाचाल... (२०), २२ एप्रिल–जागतिक वसुंधरा दिन (२७), मुखपृष्ठ चित्रकार परिचय (२८), श्रद्धांजली (३०)

पद्य... उत्तिष्ठत जाग्रत ! (मलपृष्ठाच्या आतील पानावर) – डॉ. अशोक निरफराके

या अंकातील पानांखालील काव्यपंक्ती कवयित्री आश्लेषा महाजन यांच्या आहेत.

संपादक, प्रकाशक, मुद्रक
महेन्द्र सेठिया
कार्यकारी संपादक
जयश्री काटीकर
संपादक मंडळ
शैलजा देशमुख, नीलिमा करमरकर
डॉ. कांचनगंगा गंधे, आश्लेषा महाजन
मुखपृष्ठ
संदेश जोशी
आतील चित्रे
ऋजुता घाटे, कुडल हिरेमठ
ओंकार इनामदार

मुखपृष्ठाविषयी

मुखपृष्ठावरील चित्र पुणे विद्यापीठातील मुख्य इमारती समोरील गुलमोहोराच्या झाडाचे आहे. हे चित्र जलरंगात रंगवलेले आहे. या चित्रात केशरी रंग हा प्रामुख्याने दिसत आहे. पण या केशरी रंगाला गुलमोहोराच्या खोडाच्या गडद तपकिरी रंगामुळे उठाव आला आहे.

संदेश जोशी

संपर्क पत्ता :
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०) २४२०७ १७४/१७९
ई–मेल / संकेतस्थळ :
chhatraprabodhan@jnanaprabodhini.org
www.chhatraprabodhan.org

छात्र प्रबोधन मासिकाची वर्गणी :
वार्षिक : ₹ १८० द्वैवार्षिक : ₹ ३४०
त्रैवार्षिक : ₹ ५०० दशवार्षिक : ₹ १,५००
या अंकाची किंमत : ₹ २०/–
पुण्याबाहेरील धनादेशासाठी - ₹ २०/– जादा
घरपोच दिवाळी अंकासाठी– प्रतिवर्षी ₹ ४०/– जादा

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतील असे नाही.

संवाद

सुट्टीचा डोळस वापर करू इच्छिणाऱ्या, प्रिय प्रबोधकांनो,

हा 'वासंतिक विशेषांक' तुमच्यापर्यंत पोहोचेल तेव्हा तुमची वार्षिक परीक्षा संपून सुट्टी सुरू झाली असेल. सुट्टीत काय काय करणार आहात? त्यातलं तुम्ही किती ठरवलंय? तुमच्या आई-वडिलांनी तुमच्यासाठी काय काय ठरवलंय? सुट्टीमध्ये थोडा निवांतपणा हवाच. पण याचा अर्थ सगळीच सुट्टी निव्वळ आळसात, टी.व्ही पाहण्यात, कॉम्प्युटर गेम्स खेळण्यात घालवायची असं तर नाही ना? ***मोठी माणसं 'मोठी' का होतात माहिती आहे?*** *अनेक कारणांपैकी एक महत्त्वाचे कारण म्हणजे ते त्यांचा मोकळा वेळ अधिक डोळसपणे वापरत असतात. अनेक प्रकारचे अनुभव घेण्यासाठी ते सुट्टीचा, मोकळ्या वेळेचा ठरवून उपयोग करतात.* ***तुम्ही सगळ्यांनी खूप 'मोठ्ठं' व्हावं,*** *असं मला मनापासून वाटतं आणि म्हणूनच तुमच्या मोकळ्या वेळेचा, मोठ्ठ्या* ***सुट्टीचा तुम्ही 'छान' उपयोग करावा.***

सुट्टीत कुठे ***घरगुती कार्यक्रमांना गेलात*** *तर तुमच्या नातेवाईकांची आवर्जून ओळख करून घ्या. त्यांचे नोकरी / व्यवसाय समजून घ्या. त्याला काय शिक्षण लागतं, कोणती कौशल्यं लागतात? त्या क्षेत्रात कोणती आव्हाने आहेत? त्याला पुढे किती वाव आहे? हे त्यांच्याशी होणाऱ्या गप्पांमधून समजून घ्या. त्यातून तुम्हाला एखादे क्षेत्र आवडीचे वाटले, खुणावू लागले तर त्यांच्याबरोबर काही दिवस कामाचा अनुभव घ्या. चौकसपणे त्यातले बारकावे टिपून ठेवा. छोटी-मोठी व्यावहारिक कौशल्ये शिकण्याचा प्रयत्न करा. त्यातून पुढे काय शिकायचं, कोणत्या क्षेत्रात 'कर्तृत्व' गाजवायचं, स्वत:च्या आवडी-निवडी काय, हे हळूहळू तुम्हाला समजायला लागेल.*

घरातल्यांबरोबर कुठे ***प्रवासाला जाणार असाल*** *तर थोडी पूर्वतयारी करून जा. जेथे जाणार आहात तेथील जास्तीत जास्त माहिती विविध मार्गांनी गोळा करायचा प्रयत्न करा. प्रवासाचे नियोजन करण्यात पुढाकार घ्या. जेथे जाल तेथे अनोळखी माणसांबरोबर आपणहून गप्पा मारा. स्थानिक माणसांची संस्कृती, वैशिष्ट्ये समजून घ्या. निरीक्षणातून, चौकसपणातून, नियोजनातून तुमचा प्रवास अधिक डोळसपणे करा.*

मित्रमैत्रिणींसोबत *ठरवून काही गोष्टी एकत्र करा. मग ते खेळणं असेल, स्वयंपाक करणं असेल, सायकलवरची भटकंती असेल, गावभर हिंडणं असेल, गाण्याची मैफिल करणं असेल... असं बरंच काही ठरवून करा.*

अजून एक गोष्ट कराल? ***तुमचे गाव, परिसर पाहण्यासाठी*** *मी १५-२० मुलामुलींची २ ते ३ दिवसांची सहल घेऊन येऊ इच्छितो. तुम्ही आमच्या या* ***सहलीचं नियोजन करून आम्हाला पाठवाल*** *का? कोणकोणती ठिकाणं आम्ही पाहावीत? कोणकोणत्या व्यक्तींना आम्ही भेटावं? गावाचा इतिहास, वैशिष्ट्ये आम्हाला कोण सांगेल? स्वस्तातला स्वस्त मुक्काम / जेवण कुठे होऊ शकेल? अंदाजे किती खर्च येईल? या सगळ्यांचं नियोजन करून पाठवाल? त्यात तुमचा दूरभाष क्रमांक आणि ई-मेल आवर्जून लिहा. मी तुमच्या नियोजनाची वाट पाहतो.*

'छात्र प्रबोधन'च्या ***'जोडीकार्य' उपक्रमात भाग*** *घेऊन तुम्ही तुमची सुट्टी अधिक अनुभवसंपन्न करू शकाल. काय म्हणताय? म्हणजे काय करायचं? 'छात्र प्रबोधन'च्या कार्यालयात दूरभाष करून तपशील माहीत करून घ्या आणि लागा कामाला. प्रबोधिनीतर्फे होणाऱ्या सुट्टीतल्या शिबिरांची यादी शेवटच्या पानावर दिली आहे. त्यातही अवश्य भाग घ्या. अन्य कुठल्या शिबिरात जाणार असाल तर तेथेही पुढाकार घेऊन, जबाबदारी घेऊन, मनापासून सहभागी व्हा. जमलं तर* ***एखादं शिबिर तुम्हीही घ्या.*** *ते कसं घ्यायचं याबद्दल एक लेख या अंकात दिलाय.*

मला खात्री आहे तुम्हालाही सुट्टी अधिक चांगली घालवण्यासाठी खूप काही सुचेल. जे सुचेल त्यातल्या २-४ गोष्टी तरी तुम्ही स्वत: ठरवून करा. तुमचे अनुभव आमच्यापर्यंत पोहोचवायचा कंटाळा करू नका, बरं का!

सस्नेह तुमचा,

(महेन्द्र सेठिया)

शिशिर-पालवी झडल्यावरती, उदास बोथट राने। नवरसभरल्या वसंतागमे, फुटती कोंभ नव्याने।।

प्रायोजक – शंतनू पटवर्धन, टेक्सास अमेरिका

आभाळभैरी

– म. वि. कोल्हटकर

शामलीची कमूमावशी दासनवमी उत्सवात सज्जनगडावर जाऊन सातारला आमच्याकडे आली होती.

कमूमावशीने उत्सवातला प्रसाद आणि अंगारा तर सर्वांना दिलाच; शिवाय तिने शामलीसाठी फारफार वेगळी वस्तू आणली होती. तशा त्या वस्तू दोन होत्या. मुठीएवढ्या होत्या. चपळ होत्या. ओळखा पाहू काय होत्या त्या वस्तू? नाही ओळखत? तर मग आणखी 'क्ल्यू' देतो. चादरीवर ढब्बू ठिपके असतात तसे ठिपके होते त्यांच्या अंगावर. त्या जमिनीवर रमत नाहीत. त्या झाडांवर खेळतात. पाठशिवणी खेळतात. आभाळ त्यांना आवडतं.

नाही ओळखलं? तर सांगतो मी. कमूमावशीने शामलीसाठी छोट्या दोन आवळ्याजावळ्या चिमण्या आणल्या होत्या. तुम्ही म्हणाल, 'हॅं.... चिमण्याच ना? त्यात काय वेगळेपण?' पण तसं नाही. या चिमण्या डिट्टो झाडावरच्या चिमण्यांसारख्या दिसायच्या. मण्यांएवढे डोळे टकामका फिरवायच्या आणि मज्जा म्हणजे जरा खुट्ट आवाज आला की या दोन्ही चिमण्या चिवचिव करायच्या!

शामलीने मोठ्या खुशीने त्या शोकेसमध्ये ठेवल्या. घरात कुणी मोठ्यांदा बोललं की, लगेच या दोन्ही चिमण्या शोकेसमध्ये चिवचिव करायच्या. कुणी हसलं की झालीच यांची चिवचिव सुरू. जणू काही त्या चिमण्यांना म्हणायचे होते की 'रागवा, पण जपून जपून.' 'हसा, पण पुरवून पुरवून.'

घरात कुणी रागावला आणि मोठ्याने बोलला की, त्या रागीट माणसाचे चिडून चिमणीकडे लक्ष जायचे. कुणी खो खो हसू लागला की तो पटकन सवयीने चिमण्यांकडे पाही आणि त्याच्या हसण्याला लगाम लागे.

अगदी खूप दिवसांनी शामलीच्या आईने उंच असलेल्या खिडकीतली सगळी अडगळ काढली. खिडकी झाडली. खिडकीचे दार सताड उघडले. तेव्हा खिडकीतून मोकळी हवा आणि खूप उजेड आत आला. खिडकी जुनीच पण नवीकोरी वाटू लागली. मग शामलीने उंच स्टूल घेतले आणि ती मजेत त्या लख्ख केलेल्या खिडकीत प्रथमच बसली. ती आनंदाने बाहेर पाहू लागली.

अंगणात ऊन उतरले होते. सोनचाफ्याच्या पानांची सावली रांगोळीसारखी अंगणात पसरली होती. तेव्हा शामलीच्या डोक्यात एक भन्नाट आयडिया आली.

शामली स्वयंपाकघरात गेली. स्वयंपाकघरात आजीने रोवळीत तांदूळ धुवून ठेवले होते. शामली मांजरपावलाने आत गेली. तिने मूठभर ओले तांदूळ घेतले. ती गुपचूप अंगणात गेली. तिने अंगणात चाफ्याजवळ ते तांदूळ पसरून ठेवले. नंतर तिने हळूच त्या बोलक्या चिमण्या शोकेसमधून उचलल्या. चिमण्यांना शामली म्हणाली,

''हॅलो, गुड् मॉर्निंग.''

तेव्हा दोन्ही चिमण्यांनी एकदम एका आवाजात चिवचिव केले. मग त्या चिमण्या मण्याएवढे डोळे फिरवत राहिल्या.

''जा खेळा अंगणात. घरकोंबड्या कुठल्या!''

सुदूर हा प्रवास अन् हळवी छोटी आशा।
छोट्या छोट्या सुखांसोबती जगण्याची अभिलाषा।।

असं म्हणत शामलीने त्या चिमण्यांना अलगद उचलले आणि खुल्या हवेत अंगणामध्ये चाफ्याजवळ पसरलेल्या तांदळांजवळ ठेवले.

नंतर शामली पुन्हा खिडकीत येऊन बसली आणि ती गुपचूप अंगणात पाहू लागली.

खाली अंगणात चाफ्यावर खऱ्या चिमण्या होत्या. काही चिमण्यांनी एकमेकींकडे पाहिले. 'चिवचिव' चा शब्द उच्चारला. तेव्हा अंगणात चाफ्याखाली तांदळाजवळ उभ्या चिमण्यांनीही थेट तस्से चिवचिव करून फांदीवरच्या खऱ्या चिमण्यांना प्रत्युत्तर दिले.

फांदीवरच्या चिमण्या बुचकळ्यात पडल्या. त्या उंच उडाल्या. चिमण्यांनी त्यांच्या मैत्रिणींना काहीतरी सांगितले. मैत्रिणीही खाली उतरल्या. एकदोघी धिटुकल्या होत्या. त्यांनी तांदळाभोवती गिरकी घेतली. पाहणी केली. त्या वर गेल्या.

नंतर वरच्या चिमण्या शब्द उच्चारीत. खालच्या त्यांना उत्तर देत. असा संवाद घडत गेला.

शामली खिडकीत बसून श्वास रोखून चिमण्यांची ती बातचीत ऐकत होती.

नंतर एक एक चिमणी खाली उतरू लागली. चलाखपणे दाणे टिपू लागली. माना वेळावू लागली.

चिमण्या खुषीत चिवचिव करीत सुटल्या. खेळण्यातल्या चिमण्याही चिवचिवाटात सामील झाल्या. खऱ्या चिमण्या कोणत्या, खोट्या कोणत्या काहीच कळणे शक्य नव्हते.

शामली नजरेने खोट्या चिमण्या निवडू लागली. पण शामलीला पत्ता लागेना.

आता तांदळांवर चिमण्यांची गर्दी झाली. चिमण्यांची चिमुकली चादरच अंगणात पसरली गेली.

शामली त्या चिमण्यांमध्ये एवढी रमली होती की, आपण शामली आहो, खिडकीमध्ये बसलो आहो, हे ती साफ विसरली. तिलाही 'आपण चिमणीच झालो आहोत, दाणे टिपत आहो, चिवचिव करीत आहो', असे वाटत राहिले.

'आपल्या अंगावर झगा नाही. आपल्या अंगावर खडीच्या रंगाचे पंख आहेत, आपणही झाडावर आहोत', असे शामलीला वाटले. नंतर तिच्या तोंडातून 'चिवचिव' असे शब्द आले. तेव्हा खालच्या चिमण्यांनी खिडकीकडे नजर टाकली आणि प्रति चिवचिव केले. जणू त्या खिडकीतल्या चिमणीला

। अभिनंदन... पद्मविभूषण पुरस्कार डॉ. कांतीलाल हस्तीमल संचेती (अस्थिरोगतज्ज्ञ)
। कै. प्रभाकर बळवंत करंदीकर स्मरणार्थ। **प्रायोजक – श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे**

खाली बोलावत होत्या.

शामलीचे मन खिडकीबाहेर होते. चिमण्यांमध्ये ते मिसळले. ती चिमणीच झाली होती. तिला 'चिवचिव'ची भाषा येत होती. जणू तीच तिची भाषा होती. माणसांची भाषा तिला येत नव्हती.

असा कितीतरी वेळ शामली चिमणीच बनून गेली.

इतक्यात बाहेर फेरफटका टाकण्यासाठी गेलेला आमचा बहादूर कुत्रा ऐटीत अंगणात आला आणि आभाळाकडे तोंड करून त्याने भूंक टाकली.

तेव्हा चिवचिव आणि भुर्रर असा आवाज झाला आणि चिमण्यांची ती इवली चादर उडाली. विरळ झाली. विरून गेली.

अकस्मात शामली तंद्रीतून जागी झाली. तिने अंगणात पाहिले. तिथे एकही चिमणी नव्हती. खेळातल्या चिमण्याही नव्हत्या. कुठे गेल्या त्या? कशा गेल्या त्या? शामलीने डोळे फाडफाडून झाडावर पाहिले, आभाळात पाहिले. त्या गेल्या त्या परतल्याच नाहीत.

***

– म. वि. कोल्हटकर
१६ जीवनछाया कॉलनी,
सिव्हिल हॉस्पिटलसमोर,
सातारा 415001

✻ 'सृजनाला पंख नवे' सादरीकरण स्पर्धा २०१२- निर्णय ✻

प्रथम क्रमांक : 'लचित बडफुकन', डोंबिवली (प्रबोधक गट)
द्वितीय क्रमांक : 'सवंगडी', ज्ञान प्रबोधिनी, पुणे (७ वी मुले)
तृतीय क्रमांक : 'हरिसिंह नलुआ', डोंबिवली (प्रबोधक गट)

✻ सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन ✻

'छात्र प्रबोधन'च्या वर्ष ११-१२ (इ.स. २०१०-११) मधील अंकांमधल्या साहित्यावर आधारित नृत्य, नाट्य, संगीत, अभिवाचन इ.ची 'सृजनाला पंख नवे' ही राज्यव्यापी सादरीकरण स्पर्धा याही वर्षी आयोजित करण्यात आली होती. मुलांच्या कलागुणांना वाव मिळावा. गटकार्याचा अनुभव मिळावा यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ५ ठिकाणचे (डोंबिवली, चोपडा, चाळीसगाव, निगडी, पुणे) ८ विद्यार्थीगट स्पर्धेत सहभागी झाले होते. सर्व गटांचा उत्साह, आत्मविश्वास खूपच चांगला होता. आपले सादरीकरण चांगले, उत्तम होण्यासाठी सर्व स्पर्धक धडपडत असल्याचे जाणवत होते. ही धडपड अधिक नेमकपणाने होण्यासाठी पुरस्कार प्राप्त गटांनी विशेष परिश्रम घेतल्याचे जाणवले. स्पर्धेतील पुरस्कारप्राप्त गटांना पुस्तकरूपाने बक्षिसे पाठविली जातील.

'लचित बडफुकन' या डोंबिवलीच्या गटाचा रंगमंचावरचा वावर उल्लेखनीय होता. 'नातं की कर्तव्य' ही एकांकिका या गटाने विशेष प्रयत्नपूर्वक सादर केली. 'हरिसिंह नलुआ' या गटाने पोवाड्याच्या आधारे 'छात्र प्रबोधन'ची वैशिष्ट्ये, वाटचाल कथन करीत सादरीकरण केले. ही थोडी 'हटके' कल्पना होती. 'छात्र प्रबोधन'च्या बोधचिन्हाची प्रतिकृती त्यांनी नृत्यातून सादर केली. 'सवंगडी', ज्ञान प्रबोधिनी, पुणे या गटाने सादरीकरणामध्ये विनोदाचा वापर अतिशय चपखलपणे केला. अभिवाचनही छान केले. तात्यासाहेब सामंत विद्यालय, चाळीसगाव यांचे 'रस्त्यावरील नाताळ' यावरील सादरीकरण उल्लेखनीय. पण सादरीकरणात वैविध्य असणे आवश्यक होते. बहुसंख्य गटांनी दिवाळी २०११ मधील 'शब्दफुले अक्षरली' या सौ. शैलजाताई देशमुख यांच्या लेखावर नृत्य व गायन सादर केले. काहींनी कवितांना चाली लावून समूहगान, नृत्यही सादर केले. काही गटांमध्ये मात्र वैविध्याचा अभाव जाणवला. नू. म. वि. मुलींच्या शाळेचे (पुणे) सादरीकरणही कौतुकास्पद होते.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्यादृष्टीने 'छात्र प्रबोधन'च्या अंकात साहित्य प्रकाशित केले जाते. तो दृष्टिकोन, ती साहित्यमूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजतात, फुलतात हे सादरीकरण बघितल्यावर जाणवले. याचे समाधान व आनंद सादरीकरण बघतांना झाला. पुरस्कार प्राप्त गटांना शाबासकीची थाप व बक्षिसे आहेतच. पण इतर गटांनी केलेल्या प्रयत्नांचेदेखील कौतुक! परत पुढल्यावर्षी नव्या दमाने, नव्या ताकदीने सहभागी होणार ना स्पर्धेत?

पुढील वर्ष 'छात्र प्रबोधन'चे द्विदशकपूर्ती वर्ष आहे. यामध्ये होणाऱ्या स्पर्धांमध्ये जास्तीत जास्त गट सहभागी होतील या अपेक्षेत...

परीक्षक – सुलभा मराठे, नंदिता गाडगीळ, सुलभा कुलकर्णी

असे जगणे जगणे, जणू धावणे धावणे।
भुईवरी पाय आणि आभाळाला ओलांडणे।।

खूप हट्ट केल्यावर

खूप हट्ट केल्यावर
टच-स्क्रीनवाला मोबाइल
बाबानी भेट दिलाय मला माझ्या वाढदिवसाला
पुढचं वर्ष महत्त्वाचं आहे हे बजावत
मोबाइल बाहेर न्यायचा नाही या अटीवर..
त्यात खूप गेम्स आहेत
फोटो काढता येतात हवे तेवढे
झालंच तर गाणी साठवता येतात
रेकॉर्डिंग करता येतं.. एसेमेस... मेल...
आणि खूप काय काय...

बाबा घरात नसले की
त्यांचा लॅपटॉपही मिळतो खेळायला
गूगलचे बोट धरून मी कुठे कुठे जाऊन येतो
फेसबुकवर भरपूर फ्रेंड्स आहेत माझे...
टी.व्ही. तर असतोच चोवीस तास
जगभरातलं सगळं उत्सुक केव्हाही बाहेर पडायला
रिमोटची कळ दाबली नुसती
की हवं ते उघडतं समोर..!

तरी शाळेला सुट्टी पडली
आणि आई बाबा ऑफिसला गेले
की थोड्याच वेळात नकोसे होतात
हे सदातत्पर दोस्त..
अभ्यास करून संपतो
आणि मी अगदी एकटा उरतो
जगाची सैर करण्याच्या किल्ल्या जवळ असूनही..
मला एक बहीण असती तर..!!

आसावरी काकडे, सेतू, डी. १/३ स्टेट बँकनगर, कर्वेनगर, पुणे ४११०५२

रॉक ॲण्ड पेपर स्कल्पचर

विविध आकाराचे दगड पाहताना कशासारखा हा दगड आहे, असा विचार केल्यास आकारांशी मैत्री होते. आपण पाहिलेल्या निसर्ग निर्मित अथवा मानव निर्मित वस्तू आपल्याला त्यात दिसू लागतात आणि मग आकार-रंग यांचा एक कप्पा उघडतो. तो आपल्या समोरचा दगड सौंदर्याचं रूप घ्यायला लागतो. त्या दगडातले प्राथमिक आकार लक्षात आले की महत्त्वाचं काम म्हणजे कागद, पिसं, काड्या वगैरे वस्तू घेऊन तो आकार जिवंत करणं. आपल्याला दगडामध्ये पक्षी, प्राणी, कार, जीप, बस, मानवाकृती असे अनेक आकार दिसू लागतील आणि त्यातलं सौंदर्य या साधनांद्वारे निर्माण करता येईल. मला सापडलेल्या दगडातून मान वळवलेला मोर तयार होऊ शकतो, हे लक्षात आले. कागदाचा मुटका करून मान त्या दगडाला चिकटवली. छोट्या-छोट्या कागदी तुकड्यांनी चिकटवत मानेचा आकार निर्माण केला. यासाठी खळ वापरली. त्यामुळे वाळल्यावर कडकपणा आला आणि नंतर त्यावर रंगकाम केले. दगड दिसणार नाही याची काळजी घेतली, मोराला तुरा, चोचही प्राप्त करून दिली.

– **शुभा रुद्र,** 'गोपिका', प्लॉट नं. ७, एल. आय. सी. कॉलनी, पुणे–सातारा रस्ता, पुणे ९
(दगडातून साकारलेली वेगवेगळी शिल्पे छात्र प्रबोधनच्या संकेतस्थळावर पाहा)

। अभिनंदन... पद्मविभूषण पुरस्कार कै. श्री. भूपेन हजारिका (कला - गायन, आसाम) (मरणोत्तर)।
प्रायोजक – श्री. निखिल रामचंद्र कात्रे, डोंबिवली

अपयशातून यशाकडे

डॉ. विनया जंगले

> संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. विनया जंगले यांचा जिद्दीचा, वेगळं काही करण्याच्या प्रेरणेचा हा बोलका प्रवास...

तिन्हीसांजेची दिवेलागणीची वेळ. कोकणातलं एक छोटंसं एकाकी असं कौलारू घर. घराच्या आजूबाजूला अंधार दाटत चालला होता. रातकिड्यांची किरकिर चालू झाली होती. त्या आवाजात जवळून येणाऱ्या कोल्हेकुईचा आवाज मिसळला होता. त्या घरातून बाहेर झिरपणाऱ्या कंदिलाच्या प्रकाशामुळे आजूबाजूच्या अंधाराची अधिकच तीव्रतेने जाणीव होत होती. घराच्या बाजूला छोटासा गोठा होता. गोठ्यातली जनावरं निवांत रवंथ करत बसली होती. फक्त चिमा म्हैस अस्वस्थ होती. घरमालक आणि त्यांची चार छोटी मुलं चिमावर लक्ष ठेवून उभी होती. घरमालकांच्या चेहऱ्यावर काळजी पसरली. ते तसेच बाहेर आले. त्यांनी जनावरांच्या डॉक्टरांना आणायला नोकराला पाठवलं. घरमालक आणि चारी मुलं मोठ्या काळजीने डॉक्टरांची वाट बघत होते. अर्ध्या तासातच डॉक्टरांची स्कूटर घराजवळ थांबली. घरमालक लगेच पुढे धावले. डॉक्टरांना त्यांनी गोठ्यात आणलं.

'एक तास झालाय म्हैस अडलीय,' घरमालक म्हणाले. डॉक्टर आपल्या सहायकाला घेऊन पुढे सरसावले. डॉक्टरांच्या प्रयत्नांनी थोड्याच वेळात, एकाच झटक्यात चिमाचं रेडकू सुळकन बाहेर आलं. चिमा एकदम मागे वळली. डॉक्टरांच्या सहायकाने ते रेडकू चिमाच्या पुढ्यात सरकवलं. ती त्याचं चिकट अंग चाटू लागली. ते उभं राहण्याची धडपड करू लागलं. त्या चार मुलांमधली सगळ्यांत मोठी दहा-बारा वर्षांची मुलगी भारावल्यासारखी त्या डॉक्टरांकडे बघत होती. मुक्या प्राण्यांचं दुःख दूर करणाऱ्या पशुवैद्यकाबद्दल तिला नितांत आदर वाटला. आपणही मोठेपणी असंच पशुवैद्य व्हावं, याची सुप्त बीजं त्या क्षणी तिच्या मनात पडली होती.

तसं त्या मुलीचं आयुष्य गावात वाढणाऱ्या सर्वसामान्य मुलीसारखंच होतं. फक्त एकाच बाबतीत ती इतरांच्यापेक्षा वेगळी होती. तिला वाचनाची अतोनात आवड होती. सुट्टीच्या दिवशी गावातल्या वाचनालयात बसून तासन्तास ती वाचत बसायची. त्या छोट्याशा गावातून फारशी ती कधीच बाहेर पडली नव्हती. पण कथा, प्रवासवर्णनं, आत्मचरित्रं वाचल्यामुळे तिला तिच्या गावाबाहेरच्या जगाची माहिती होती. त्यामुळे शाळेतल्या वक्तृत्व स्पर्धांमध्ये ती इतरांमध्ये उठून दिसायची. स्त्रियांचे हक्क, स्त्री- पुरुष समानता याबाबतीत तिने तिचे विचार वाचनातून बनवले होते. हेच विचार तिला पुढे पुरुषप्रधान असलेल्या पशुवैद्यकाच्या क्षेत्रात खंबीरपणे उभे करणार होते, याची तिला त्या वयात जाणीव नव्हती.

पण याला आणखी एक गोष्ट कारणीभूत होती, ती म्हणजे तिच्या आई-वडिलांचे विचार. त्यांनी चारी मुलांना शिक्षण देताना मुलांमुलींत कधीच भेदभाव केला नाही. तिची आई प्राथमिक शाळेत शिक्षिका होती, तर वडील पोस्टमास्तर. वडिलांकडून तिच्यावर सचोटीचा, प्रामाणिकपणाचा आणि आईकडून उद्योगी

झाले मळभही दूर, ...आला प्रकाशाचा पूर।
किती मंद, सौम्य सूर... पानापानांत संतूर॥

राहून स्वत:चा सतत विकास साधायचा संस्कार झाला होता. वडिलांनी नोकरीव्यतिरिक्त पूरक व्यवसाय म्हणून म्हशी पाळायला सुरुवात केली. पोस्टाकडून मिळालेल्या प्रशस्त सरकारी निवासस्थानात म्हशी पाळणं शक्य नव्हतं. म्हणून त्यांना गावापासून दूर असलेल्या निर्जन ठिकाणी राहायला यावं लागलं. एवढ्या दूरवर की तिथपर्यंत वीजही पोहोचली नव्हती. पाण्याची विहीरही दूरवर होती. तिथून पाणी आणायला लागायचं. मुलांची वयं लहान असल्यामुळे ती या बदललेल्या वातावरणातही पटकन रुळली. जीवनशैली कष्टाची होती, पण घरात दूधदुभत्याची चंगळ होती. मुलांच्या अभ्यासावर आईचं बारकाईनं लक्ष असायचं. आई स्वत: चार मुलांचं सगळं करून नोकरी करायची, म्हशीच्या कामात मदत करायची आणि हे सगळं कमी की काय म्हणून पदवीचा अभ्यासही करायची! रात्री कधीही जाग आली तर मुलांना आई कंदिलाच्या उजेडात अभ्यास करताना दिसायची. त्यामुळे चारी मुलांवर आपोआप अभ्यासूपणाचे संस्कार झाले. चारी मुलांना घरच्या कामात मदत करावी लागायची. त्या मोठ्या मुलीला म्हशींना कधी कधी चरायला न्यावं लागायचं. तो वेळ फुकट घालवायचा नाही म्हणून ती अभ्यासाची पुस्तकं सोबत न्यायची. हिरव्यागार माळरानाच्या रंगीबेरंगी रानफुलांची नक्षी पसरलेल्या त्या मोहक वातावरणात ती हातातल्या पुस्तकात गढून गेलेली असायची. त्या क्षणी जणू ती त्या निसर्गाचाच एक भाग व्हायची.

ती पाचवीला होती तेव्हाची गोष्ट. तिला आईने संध्याकाळची एक शिकवणी लावली होती. शिकवणी रात्री पावणे आठला सुटायची. गावापासून तिचं घर खूप लांब होतं. त्या दिवशी ती शिकवणीवरून निघाली. गावातला मुख्य रस्ता संपला. समोर छोटीशी टेकडी. आजूबाजूला पसरलेला मिट्ट काळोख. स्तब्ध उभी असलेली झाडं आणि या सगळ्यातून गेलेली तिच्या घराची वळणा-वळणाची वाट. ती नेहमीप्रमाणे चालत होती. एवढ्यात बाजूच्या झाडावरून कसलातरी आवाज आला. तिच्या छातीत धडधडू लागलं. आतापर्यंत ऐकलेल्या भुताखेतांच्या गोष्टी आठवल्या. ती धावू लागली. मागे कोणीतरी लागलंय असा तिला भास होऊ लागला. घरी आली तेव्हा ती घामाने डबडबलेली होती.

''तुम्ही मला घ्यायला का येत नाही? मला एकटीने यायला भीती वाटते भुताची '' हुंदके देत ती म्हणाली.

वडील तिला म्हणाले, ''हे बघ, या जगात भूत-बित काहीसुद्धा नसतं. सगळे मनाचे खेळ आहेत. तुला न्यायला कोणीच येणार नाही, तुला एकटीलाच यावं लागेल.'' त्यावेळी तिला वडिलांचे ते शब्द खूप कठोर वाटले. त्यानंतर ती शिकवणीवरून एकटीनेच येऊ लागली.

... या गोष्टीतल्या त्या छोट्या मुलीचं नाव विनया. म्हणजेच आजची मी डॉ. विनया जंगले. स्वत:ला शोधायला सुरुवात केली की आपोआप मन निरागस बाळपणाकडे धाव घेतं. बाळपणातल्या गोष्टी चित्रपट बघावा तशा मनाच्या पडद्यावर उमटत जातात. स्वत:च्याच आयुष्याकडे तिऱ्हाईताच्या नजरेने बघताना आयुष्याची अनेक कोडी उलगडत जातात.

माझी त्यावेळची भीती काही लगेच गेली नाही. पण त्या भीतीवर मात करण्याचे मार्ग मी हळूहळू शोधले. कॉलेजचा प्रवेश असो की बसमधून दूरच्या गावात आजोळी जाणं असो; लहानपणापासून वडिलांनी मला एकटीनेच जायला लावलं. त्यामुळेच पुढच्या आयुष्यात पशुवैद्यकीय शिक्षण घरापासून लांब राहून घेताना, रात्री-बेरात्री एकटीने प्रवास करताना मला कधीच भीती वाटली नाही. आज वेळी-अवेळी अत्यवस्थ प्राण्यांवर उपचार करायला जाताना मला भीती वाटत नाही. आई वडिलांनी मला मुलगी म्हणून जशी वेगळी वागणूक दिली नाही; त्याचप्रमाणे मुलगी म्हणून अति काळजीही कधी केली नाही. आज मी 'संजय गांधी राष्ट्रीय उद्याना'त पशुवैद्यकीय अधिकारी आहे. मी जेव्हा मनुष्यवस्तीत शिरलेल्या बिबट्याला पकडायला जाते, जंगली हत्तीला सामोरी जाते, तेव्हा लोक मला विचारतात,

''तुम्हाला भीती नाही का वाटत?'' मी क्षणभर गप्प

। अभिनंदन... पद्‌मविभूषण पुरस्कार श्री. के. जी. सुब्रमण्यम(कला - चित्र आणि शिल्प, प. बंगाल)।
। डोळस व्हा आणि हिंमतीने पुढे चला!। **प्रायोजक – डॉ. सतिशचंद्र गोरे, पुणे**

बसते. अदृश्य भुताच्या भीतीने भेदरलेली ती लहानशी मुलगी मला आठवते. वडिलांचा त्या रात्रीचा कठोर चेहरा डोळ्यांसमोर उभा राहतो. आणि मी ठाम स्वरात म्हणते,

''भीती; मग ती कशाचीही असो, तिच्या मुळापर्यंत पोहोचलं की ती आपोआप नाहीशी होते.''

अठराव्या वर्षी मी पशुवैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश

अचानक कुठेतरी पहाटेचा तीनचा घड्याळाचा गजर झाला. मी चादर बाजूला टाकून उठून बसले. लाईट लावला. सुजलेल्या डोळ्यांना पाणी लावलं. आरशात स्वत:ला पाहिलं. मलाच मी ओळखू येत नव्हते. शांत बसून राहिले. मनाशीच विचार करत राहिले -

'मी लहानपणापासून एवढं वाचन करत राहिले. अपयशातून

घेतला होता. प्रवेश घेतल्या घेतल्याच महिन्याभरात महाविद्यालयाचा संप चालू झाला. नवीन स्वप्नं डोळ्यांत साठवत नव्या नवलाईने महाविद्यालयात प्रवेश घेतला होता आणि अचानक संप चालू. संप सहा महिने चालला. लगेचच परीक्षांचं वेळापत्रक लागलं. संपकाळात दंगा करणारी मुलं आता माना मोडून अभ्यास करत होती. पण माझ्या कुठल्याच विषयांच्या संकल्पनाच पक्क्या झाल्या नव्हत्या. वाचूनही फारसं डोक्यात शिरतच नव्हतं. त्यातच परीक्षा पार पडल्या. मला फारसं चांगलं यश मिळणार नाही याची खात्रीच होती. पण तो पहिल्या सेमिस्टरचा निकाल जेव्हा बघितला तेव्हा डोक्यावर आभाळ कोसळल्यासारखं झालं. मी आठपैकी फक्त एका विषयात पास झाले होते. अपयश येईल असं जरी वाटलं होतं तरी इतकं कडाक्याचं अपयश येईल असं वाटलं नव्हतं. कॉलेजमध्ये असेपर्यंत घशात अडकवून ठेवलेले अश्रू वसतिगृहात गेल्यावर रूमचा दरवाजा लावल्यावर डोळ्यातून घळाघळा वाहू लागले. आयुष्यात पहिल्यांदाच नापास होणं म्हणजे काय ते कळलं होतं. डोळ्यावर चादर घेऊन मी रात्रभर रडत राहिले.

बाहेर पडणाऱ्या माणसांची चरित्रं वाचली. आणि आज माझ्यावर ही वेळ आली तर मी काय नुसतं रडत बसायचं?' शांतपणे अभ्यासाची पुस्तकं पुढे ओढली. त्या क्षणापासून मी पशुवैद्यकीच्या अभ्यासात पूर्णपणे स्वत:ला बुडवून टाकलं. आपण उत्तम पशुवैद्यक बनायचंच, हे मनाला सतत बजावत राहिले. त्यानंतरही काही लगेच मला घवघवीत यश मिळालं नाही, पण विषयाच्या मूळ संकल्पना पक्क्या केल्याने पहिल्या सेमिस्टरसारखं लाजिरवाणं अपयश पुन्हा आलं नाही. अभ्यासाला प्रॅक्टीकलची जोड हवी म्हणून सतत फावल्या वेळात कॉलेजच्या वॉर्डसमध्ये प्राण्यांवर होत असलेले उपचार निरखत राहिले. संधी मिळेल तेव्हा स्वत: उपचार करू लागले.

आज मी सहजपणे वन्यप्राण्यांच्या क्षेत्रात वावरते. पण कॉलेजमध्ये मला याची सुतराम कल्पनाही नव्हती. त्या काळात कॉलेजमध्ये मुख्यत्वे करून पाळीव प्राण्यांबद्दलच शिक्षण दिलं जायचं. सुमारे वीस वर्षांपूर्वी मी पशुवैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश केला तेव्हा सत्तर जणांच्या वर्गात आम्ही केवळ चारच मुली होतो. जसजसे दिवस जाऊ लागले, तसतसे मला या

ती अखंड गंभीर गाज, अन् चंद्र डहुळला आज।
लाटांचे नर्तन धुंद, अन् फेन - कळ्या स्वच्छंद।।

क्षेत्राचे वैविध्य जाणवू लागले. कितीतरी प्राणी, पक्षी, त्यांच्या वेगवेगळ्या शरीररचना, अंतर्गत अवयवांचे विविध तऱ्हांचे कार्य; त्यामुळे अर्थातच प्रत्येकाच्या निदानाची आणि उपचाराची दिशाही वेगळी.

आमच्या शरीरशास्त्राच्या वर्गात शिक्षक वेगवेगळ्या प्राण्यांची हाडं घेऊन यायचे. कुत्र्याची, म्हशीची, गायीची, बकरीची अगदी कोंबडीचीसुद्धा. हाडांवरच्या निरनिराळ्या खुणांवरून ती हाडं कोणाची ते ओळखायचं. प्रत्येक प्राण्याची पोटाची अंतर्रचना वेगळी. त्यामुळे पचनाच्या पद्धतीही वेगळ्या. गायी, म्हशींच्या पोटाचे चार कप्पे तर घोड्याचं, कुत्र्याचं माणसासारखंच एका कप्प्याचं पोट. तिसऱ्या वर्षी औषधशास्त्राच्या वर्गात एकच औषध विविध प्राण्यामध्ये किती वेगवेगळा परिणाम घडवून आणते, हे समजून घेताना की खूप गंमत वाटायची. उदाहरणार्थ, मॉर्फिन हे औषध कोणालाही अगदी माणसालाही दिले तर गुंगी येते, पण मांजर मात्र या औषधामुळे उत्तेजित होते.

इंजेक्शनच्या तरी किती तऱ्हा! म्हशीला इंजेक्शन देताना सिरिंज जोडायची. घोड्याची कातडी एवढी पातळ की अगदी लोण्यात बोट बुडवावं त्या सहजपणे सुई कातडीत शिरणार. शिरेतून इंजेक्शन द्यायचं तर म्हशीची अगदी बोटासारखी जाड शीर तर मांजराची केसासारखी बारीक शीर! पहिल्या ठिकाणी ताकद आणि कौशल्य दोन्हीची आवश्यकता तर दुसरीकडे हाताच्या नाजुकपणाची आणि नेमक्या ठिकाणी सुई टोचण्याची आवश्यकता !

पाळीव प्राण्यांच्या क्षेत्रात खेडेगावात मी प्रथम कामाला सुरुवात केली. पशुपालकांपर्यंत पोहोचण्यासाठी मला सर्वप्रथम दुचाकी शिकून घ्यावी लागली. कुठल्यातरी कोपऱ्यात राहणारा गरीब शेतकरी; ज्याच्यापर्यंत साधी वीजही पोहोचलेली नाही, तिथे पोचायचं, त्याच्या गाई-म्हशीवर उपचार करायचे आणि त्याची कृतज्ञताच फुलासारखी ओंजळीत धरून परतायचं. प्रसंगी मला डोंगर चढावे लागले, गुडघा गुडघा पाण्यातून नदी पार करावी लागली. पण हे सगळे अनुभव मला समृद्ध करून गेले.

पुढे विवाहानंतर मी जेव्हा मुंबईला आले तेव्हाच मला वन्य प्राण्यांच्या उपचाराचं नवं आव्हानात्मक क्षेत्र खुणावू लागलं. आपल्या अंतर्गत ऊर्मींना या क्षेत्रात खराखुरा वाव मिळेल, याची खात्री झाली. एकच अडचण होती- माझा मुलगा खूपच लहान होता. ऋधीलशी, माझ्या पतीशी मी चर्चा केली. तो फक्त एवढंच म्हणाला,

''तुला जर या क्षेत्रात तुझी प्रगती होईल याची खात्री असेल तर तू जरूर जा.'' आणि त्याने दिलेल्या विश्वासावर सन २००८ मध्ये मी 'संजय गांधी राष्ट्रीय उद्याना'त रुजू झाले. यातल्या वेगळ्या क्षेत्रातील जबाबदाऱ्यांची मला जाणीव झाली. वन्यप्राण्यांच्या अभ्यासाला मी सुरुवात केली. माझा कॉलेजमधला सहाध्यायी डॉ. अनिरुद्ध बेलसरे, जिजामाता उद्यानातील डॉ. त्रिपाठी, तसेच संजय गांधी उद्यानात प्रदीर्घ काळ राहिलेले डॉ. बारहाते या साऱ्यांनीच मला मोलाचं मार्गदर्शन केलं.

माझ्या लक्षात आलं, हरणाची शरीररचना गाई-म्हशीसारखी तर वाघ, सिंह, बिबटे या तर मांजराच्या मोठ्या प्रतिकृती! हत्तीचं एका कप्प्याचं पोट अगदी घोड्यासारखंच. पण त्यामुळे वन्यप्राण्यांच्या उपचाराची सगळीच कोडी सुटली नाहीत. कारण जसं पाळीव प्राणी आणि वन्यप्राणी यातलं साम्य समजलं तसंच त्यांच्यातला विरोधाभासही लक्षात घेणं आवश्यक होतं. वन्यप्राण्यांचं माणसांना घाबरणं, प्रसंगी आक्रमक होऊन माणसावर हल्ला करणं हे समजून घेणं महत्त्वाचं होतं. त्यासाठी मला वन्यप्राण्यांच्या मानसशास्त्राचा अभ्यास करावा लागला. कळपाने वावरणाऱ्या हत्ती, हरणं, माकडं, सिंह यांच्यावर उपचार करताना त्यांच्या कळपाच्या संदर्भातच त्यांचा विचार करावा लागतो. तर वाघ, बिबट्या सारख्या जंगलातल्या एकट्या जगणाऱ्या व स्वतःचे कार्यक्षेत्र असलेल्या प्राण्यांना उपचारानंतर जंगलात सोडताना त्यांच्या-त्यांच्या कार्यक्षेत्रातच सोडण्याची काळजी घ्यावी लागते. दिल्लीला 'सेंट्रल झू ऑथॉरिटी' मार्फत वन्यप्राण्यांबाबत होणारे वेगवेगळे कोर्सेस मी याच

। अभिनंदन... पद्मविभूषण पुरस्कार कै. श्री. मारिओ दि. मिरांडा (कला - कार्टुनिस्ट, गोवा) (मरणोत्तर)।
प्रायोजक – श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे

काळात केले. मी जेव्हा बाहेर असेन तेव्हा घराची पूर्ण जबाबदारी ऋधीलने सांभाळली. त्यामुळेच मी एवढं साध्य करू शकले.

ऋधीलने जरी पाठिंबा दिला तरी माझ्या बऱ्याच हितचिंतकांनी मला त्यापासून परावृत्त करण्याचाही प्रयत्न केला. 'एका स्त्रीला हे जमेल का?' हा प्रश्न त्यांच्या मनात होता. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातल्या पशुवैद्याला महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यांत वाटेल तिथे जावं लागतं, हेही सांगण्याचा त्यांनी प्रयत्न केला. पण हे ऐकल्यावर तर मला आनंदाच्या उकळ्याच फुटल्या. बरेच जण मला थट्टेनं म्हणतात, ''तुमचं आडनाव तुमच्या व्यवसायाला अनरूप आहे.'' हे नाव तर माझं लग्नानंतरचं आहे, पण निसर्गात फिरण्याची, पक्षी निरीक्षणाची मला पहिल्यापासूनच खूप आवड होती. धाडसी वृत्ती तर रक्तातच भिनली होती.

या क्षेत्रात काम करताना खरोखर निसर्ग चहूअंगानी मला सतत भेटत राहिला. काही दिवसांपूर्वीच आमच्या इस्पितळात समुद्रातील 'ऑलिव्ह रिडले' कासव उपचारासाठी दाखल झाले होते. उपचार झाल्यावर त्याला पुन्हा समुद्रात सोडण्यासाठी आमचे पथक निघाले. भाईंदरला असलेल्या उत्तनच्या बंदरावर आम्ही पोहोचलो. बंदरावर कोळ्यांच्या बोटी होत्या. त्यात बसलेले कोळी मोठ्या उत्सुकतेने आमच्याकडे पाहात होते. आम्ही गाडीतून भल मोठं कासव काढलेलं बघून ते आश्चर्यचकित झाले. त्यातलाच एक पुढे झाला. त्याने कासव आपल्या हातात पकडलं. आम्ही वनखात्याची माणसं असून समुद्रात कासव सोडण्यासाठी आलो आहोत, हे कळल्यावर सारेच जण आमच्या मागे मागे येऊ लागले. आम्ही ते कासव समुद्राच्या दिशेकडे तोंड करून ठेवले. पण ते मागे फिरले. आम्ही सारे त्याच्याकडे पाहात होतो. आपले टपोरे डोळे विस्फारत ते कासव पुन्हा पाण्याकडे वळले. ते अलगद पाण्यात उतरलले, त्याने आपली मान वर काढली आणि अफाट समुद्राकडे बघत क्षितिजाच्या दिशेने निघाले. समुद्राचं ते निळं निळं पाणी, त्यावर तरंगत चाललेलं ते आमचं कासव त्या दिवशी मला एखाद्या जलदेवतेसारखं वाटत होतं. कासवाला निरोप देण्यासाठी आमच्या समवेत जमलेल्या कोळ्यांनी त्याच्याकडे बघत हात जोडले. तो उत्तनचा समुद्र आणि त्याच्याच सोबतीने राहणारे ते कोळी मनात कायमचे वसतीला आले.

एकदा आमच्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या जंगलातलं एक हरीण जखमी झालं होतं. त्याला बेशुद्ध करून आम्ही पकडलं. त्याच्या जखमांवर उपचार केले आणि त्याला पुन्हा त्याच्या कळपात सोडण्यासाठी आम्ही उद्यानाच्या दाट जंगल भागात प्रवेश केला. जंगलाच्या मध्यभागातून वाहणाऱ्या एका ओढ्याच्या काठी आम्ही गेलो. बेशुद्ध हरणाला उचलून ओढ्याच्या काठावर ठेवले. मी त्या हरणाला पुन्हा शुद्धीवर यायचे इंजेक्शन देत होते. सभोवार स्तब्ध उभी असलेली झाडं. आजूबाजूला निरव शांतता! फक्त पक्ष्यांची किलबिल आणि समोरून वाहणारा ओढ्याचा झुळझुळ प्रवाह. मी क्षणभर स्तब्ध झाले. रॉबर्ट फ्रॉस्टची कविता नकळत ओठांवर आली-

Woods are lovely, dark & deep,
But I have promises to keep.
Miles to go before I sleep
Miles to go before I sleep.

आज जेव्हा मी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाची पशुवैद्यकीय अधिकारी म्हणून वावरते, वन्यप्राण्यांच्या पशुवैद्यकीमध्ये असलेले 'ग्लॅमर' अनुभवते, त्यावेळी मनाच्या एका कोपऱ्यात कॉलेजच्या पहिल्या सेमिस्टरचं अपयश ताजं ठेवते. कारण कॉलेजच्या पहिल्या वर्षातल्या त्या अपयशाने मला खूप काही शिकवलं. आयुष्यात कितीही दु:ख झालं, कितीही मोठी निराशा आली तरी जिद्द ठेवली तर आपण त्यातूनही बाहेर पडून यशाला गवसणी घालू शकतो; हा महत्त्वाचा धडा मला त्या काळाने शिकवला.

***

डॉ. विनया जंगले
पशुवैद्यकीय अधिकारी कार्यालय,
संजय गांधी राष्ट्रीय उद्यान,बोरिवली (पू.) मुंबई - ६६
vosgnp@gmail.com

फ्रेम

आजकाल पॅकिंगसाठी ॲल्युमिनिअम फॉईलचा वापर खूप वाढला आहे. घरी आलेल्या 'चांदीच्या' कागदाचे काय करावं, हा खरंतर प्रश्न पडतो. थोडी चिकाटी, कल्पकता दाखवली तर त्यातून शोभिवंत वॉलपीस, टेबलावर ठेवण्यासाठीची फ्रेम वगैरे गोष्टी आपण करू शकतो.

साहित्य - साधारण ४ मि. मि. जाडीची आयताकृती काच (घरातील फुटलेल्या आरशाची काच व्यवस्थित कापून आणून आपण यासाठी वापरू शकतो), ग्लास लायनर (काळा), तुम्हाला आवडतील असे २-३ स्टुडंटस् ग्लास रंग, कार्डशीटचा काचेच्या आकराचा तुकडा, ॲल्युमिनिअम फॉइल, रंगीत सेलोटेप इ.

कृती - काचेचा तुकडा स्वच्छ पुसून त्यावर चारही बाजूंनी काळ्या लायनरने चौकट आखून घ्यावी. मधील भागात आपले आवडते चित्र लायनरनेच काढून घ्यावे. चित्र काढताना कोणताही आकार बंदिस्त स्वरूपात काढावा. लायनर एक दिवस पूर्णपणे वाळू दयावा. दुसऱ्या दिवशी ग्लास कलर हलक्या हाताने बंदिस्त भागात सोडावे. वरून व खालून वेगवेगळे रंग सोडून शेडींगही करता येईल. रंग देऊन पूर्ण झाल्यानंतर फ्रेम १ दिवस वाळू दयावी. काचेपेक्षा साधारण १-१ इंच मोठा ॲल्युमिनिअम फॉईलचा तुकडा घेऊन तो हलक्या हाताने चुरगळावा व अगदी सावकाश सरळ करावा. त्यावर अनेक चौकोन-त्रिकोण दिसू लागतील. काचेच्या तुकड्यावर; जिथे आपण चित्र काढले आहे, त्या बाजूवर ॲल्युमिनियम फॉईलचा चकचकीत भाग येईल अशा रीतीने ठेवावा. हलक्या हाताने तो पसरून दाबावा. त्यावर कार्डशीट ठेवावे व चारही बाजूंनी सेलोटेप लावावी. सेलोटेप थोडी काचेवर आणि थोडी कार्डशीटवर येईल अशा तऱ्हेने संपूर्ण फ्रेमला चिकटवून घ्यावी. अर्थातच ही फ्रेमची मागची बाजू झाली. बाजू उलटल्यावर सुंदर फ्रेम तयार झालेली दिसेल. (रंग न देता फक्त काळ्या रंगाने आऊट लाइन करून फॉईल लावलेली फ्रेमही छान दिसते.) याबरोबरच घरातील कुंच्याच्या काड्या काडेपेटीच्या काड्या, कापूस, वाया गेलेल्या कृत्रिम फुलदाण्यांमधील पाने, फुले चिकटवून केलेल्या फ्रेम्स्ची छायाचित्रे पाहा 'छात्र प्रबोधन'च्या संकेतस्थळावर.

– लीना तलाठी

७, याद सहनिवास, भूखंड ९, सहवास सोसा., कर्वेनगर, पुणे – ५२, linaltalathi@gmail.com

---

३

'क्लिक' करण्यापूर्वी

सुंदर वळण

मुखपृष्ठाच्या आतील पानावरील चित्रामध्ये आपल्याला एक रस्ता दिसतो आहे. त्यावरून चालणाऱ्या माणसामुळे या फोटोमध्ये जास्त रंगत आली आहे. चित्र अधिक सजीव झाले आहे. हा माणूस अगदी मधोमध न ठेवता डाव्या कडेला आहे. रस्त्याला पुढे सुंदर वळण मिळाले आहे. त्यामुळे चित्र उठावदार झाले आहे. माणूस चित्राच्या मध्ये ठेवला असता तर हे वळण मिळाले नसते. आणि वळणाचा फोटो काढताना माणूस त्यात घेतला नसता तरी चित्राला रंग चढला नसता. रस्ता, त्याचं वळण आणि माणूस यांचा परस्पर संबंध, या तिघांचं महत्त्व या चित्रातून व्यक्त होत आहे.

सरकारतर्फे प्रतिष्ठेचे असे 'पद्म'पुरस्कार नुकतेच जाहीर झाले. पुरस्कारप्राप्त सर्व मान्यवरांचे 'छात्र प्रबोधन'तर्फे अभिनंदन ! त्या पुरस्कारांपैकी काही या अंकातील पानांखालच्या ओळी देत आहोत. पुरस्कारप्राप्त व्यक्तींचे नाव व त्यांचे क्षेत्र कंसात लिहिले आहे. महाराष्ट्राबाहेरच्या व्यक्तींच्या नावापुढे त्यांच्या राज्याचेही नाव दिले आहे. या सगळ्या मान्यवरांची माहिती मिळवा. त्यांचे कार्य जाणून घ्या.

। अभिनंदन... पद्मविभूषण पुरस्कार श्री. टी. व्ही. राजेश्वर (नागरी सेवा, दिल्ली)।

विज्ञान शिबिरे कशी घ्याल?

नचिकेत नित्सुरे

सुट्टीमध्ये तुम्ही दोस्तमंडळी बरीच मजा करत असाल. खरं म्हणजे तुम्हाला अनेक 'व्यक्तिमत्त्व विकसनाची' खात्री देणाऱ्या, गंमत आणणाऱ्या शिबिरांचाही कंटाळा आला असेल. त्यात आणि मी या लेखातून तुम्ही शिबिर कसे घ्या, असे सुचवणार आहे म्हटल्यानंतर तुम्हाला त्रास वगैरे वगैरे वाटू शकेल. पण माझ्या डोक्यात आत्ता वेगळेच 'प्लॅन' आहेत... तुम्ही स्वत:ला आणि दुसऱ्यालाही कंटाळा न आणणारे उपक्रम आयोजित करून एक वेगळा अनुभव घेऊ शकाल.

सर्वप्रथम आपण एक महत्त्वाची गोष्ट ठरवून टाकू: ताई-दादा किंवा आई-बाबा यांच्या मोबाईलमधील स्टॉपवॉच, पट्टी, कोनमापक, स्वयंपाकघरातले मापटे किंवा मापाचे ग्लास अशाच गोष्टी वापरून आपण जे काही मोजायचंय ते मोजणार. हो, मोजावं तर लागणारच, कारण की विज्ञानात काहीतरी मोजणं ही फार महत्त्वाची गोष्ट असते. अर्थातच, जे काही मोजायचं आहे त्याची निरीक्षणंही करावी लागतात, मगच काहीतरी मोजता येतं आणि मगच काही आडाखे बांधता येतात. आणि आडाखे बांधून ते प्रयोगाच्या साहाय्याने तपासता आले, म्हणजे मगच आपल्याला विज्ञान समजू शकते.

मी कितीही विज्ञान, विज्ञानाचा जयघोष लावला, तरी सुट्टी ही मजेत घालवण्याची गोष्ट असल्यामुळे ३ दिवसांहून मोठं शिबिर घेऊ नये, असं मला वाटतं. आणि एका दिवशी जास्तीत जास्त ७ तास शिबिर घ्यावं असंही मला वाटतं. म्हणजे सकाळी ९ ते १२ मधे काही सत्रं असावीत आणि मग १२ ते १ या जेवणाच्या एका तासाच्या वेळानंतर मग ४ तास (म्हणजे दु. ५ वाजेपर्यंत) सत्रं घ्यावीत. हे सुटसुटीत नियोजन असणाऱ्या शिबिराचं नियोजन असू शकतं. (दुपारच्या सत्रात १५ मिनिटांची सरबतं (किंवा माझ्यासारख्या चहाबाजांसाठी चहा), छोटा नाश्ता अशासाठीपण मोकळीक असली पाहिजे बरं का !!)

विज्ञान शिबिर जे माझ्या डोक्यात आहे त्यासाठी प्रयोगशाळा लागत नाही बरं का! एखाद्या सोसायटीचं पार्किंग, एखादं मंदिर, छोटा हॉल, अशा जागा असं शिबिर घ्यायला पुरेशा आहेत. खडू-फळा असला तर छान, नाहीतर मोठे कार्डशीट आणि स्केचपेन्स हे ही पुरेसं असतं. पुष्कळ ठिकाणी टी.व्ही. आणि डी.व्ही.डी. प्लेअर उपलब्ध झालेले आहेत आणि संगणकही ! त्यामुळे याचा वापर करूनही आपण काही सत्रं ठरवू शकतो.

पण मी अजून या शिबिराकरिता लागणारी सगळ्यात महत्त्वाची गोष्ट सांगितलीच नाही ! ती गोष्ट आहे, प्रचंड उत्साह आणि कोणत्याही गोष्टीला आपल्याला उत्तर मिळू शकतं असा आत्मविश्वास !! आता या दोन गोष्टी तुमच्यात आहेत की नाही हे शोधून काढायला तुम्हाला हे शिबिर घ्यावंच लागेल.

असो; जागा, खाणे- पिणे, साहित्य या महत्त्वाच्या पण पूरक गोष्टींचे तपशील तुमच्यावर सोडून आता आपण विज्ञान शिबिरात 'विज्ञान' कोणकोणत्या प्रकारे अवतरू शकतं हे पाहू. काय काय करता येईल बरं विज्ञान शिबिरात?

१. छोटे, छोटे प्रयोग करणे;
२. विज्ञान-खेळणी बनवणे;
३. आसपासच्या गोष्टींचे निरीक्षण करणे;
४. विज्ञान-कथा वाचणे, स्वत: लिहिणे;

५. गटकार्य करून एखादा प्रश्न सोडवणे आणि
६. वरती लिहिल्याप्रमाणे कशाविषयीतरी आडाखा बांधून तो तपासून बघणे.

अशा सहा प्रकारच्या सत्रांच्या साहाय्याने विज्ञान शिबिर आयोजित करता येईल. आता एकेक गोष्ट तपशिलात पाहू. पण, त्याआधी एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घेऊ; 'छात्र प्रबोधन' मध्ये विज्ञानाविषयी इतकं विपुल लेखन झालेलं आहे, की त्याची नोंद न घेता विज्ञान शिबिर घेणं वेडेपणाचंच ठरेल. आणि सुदैवाने, सन २००१ ते २०१० या दहा वर्षांची डी.व्ही.डी.च आता सहजगत्या उपलब्ध असल्याने, या दहा वर्षांतील विज्ञानाबद्दलचे जे जे साहित्य अंकात प्रकाशित झालेलं आहे, ते सारंच्या सारं तुम्ही वापरू शकाल. सहज म्हणून हा लेख लॅपटॉपवर टंकित करत असतानाच मी ती डी.व्ही.डी. आत सरकवली आणि शोध घेतला तर मला २१३ विविध लेख/ स्फुटं विज्ञानावर आलेली आहेत, असं दिसून आलं. हे सर्व लेखन तुमच्या विज्ञान शिबिरासाठी उपयोगी पडणार आहेच, नाही का?

आता मात्र या सहाही प्रकारांचे तपशील पाहू, म्हणजे आपल्याला (७ तास × ३ दिवस) २१ तासांचे छान नियोजन करता येईल.

१. छोटे छोटे प्रयोग : स्ट्रॉ, फुगे, नाणी, मेणबत्त्या, पाणी, वॉशिंग-मशिनचे पाईप इत्यादी गोष्टींच्या साहाय्याने भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्र यांतील अनेक सोपी सोपी तत्त्वे उलगडून पाहता येतात. फुगा न फोडता सुई त्यातून आरपार घालणे, वॉशिंग मशिनच्या साहाय्याने (तो पाईप जोरात गोल गोल फिरवून) कागदाचे कपटे हवेत उडवणे, सॉसच्या बाटलीत पाणी भरून तिच्यावर हवा फुंकून शिट्टी वाजवून दाखवणे इ. असे विविध छोटे प्रयोग करता येतील. जर त्यांच्यामागचे विज्ञान व्यवस्थित सांगायला गेलो, तर एका तासात ६-७ प्रयोगच दाखवून होतात. अनेक शाळांमध्ये हे प्रयोग दाखवताना मुलांना आलेले उत्साहाचे भरते तुम्हालाही अनुभवता येऊ शकेल. यातील काही प्रयोग 'छात्र प्रबोधन'च्या १० वर्षांतील अंकात आलेत, बरेच प्रयोग अरविंद गुप्तांच्या संकेतस्थळावर (http://arvindguptatoys.com) वर उपलब्ध आहेत. काही सुंदर सुंदर प्रयोग (http://krampf.com) या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तर, विज्ञानासकट बऱ्याच प्रयोगांचे वर्णन करणाऱ्या दोन पुस्तिका ज्ञान प्रबोधिनीत उपलब्ध आहेत; त्यांचाही तुम्हाला उपयोग करता येईल. आता तुम्हीच ठरवा की हे सत्र १ तास घ्यायचं का २ तास?

२. विज्ञान-खेळणी : आपल्या अंकांत ज्यांचे भरपूर लेख आहेत, असे टुमणे काका अशी विज्ञान खेळणी बनविण्यात अगदी तरबेज आहेत. वर ज्या संकेतस्थळाचा पत्ता दिला आहे ते अरविंद गुप्तांचं संकेतस्थळ तर अशा खेळण्यांचा खजिनाच आहे ! जराशी ताकदवान चुंबकं मिळाली तर विविध प्रकारच्या मोटर्स, जनरेटर्स, त्यांच्यावर पेटणारे एलईडी दिवे अशी मजा मजा करता येते. रामपुरी चाकू, कागदाचे हेलिकॉप्टर अशी गंमतशीर प्रकारातली खेळणी तयार करता येतील. सायकलचे व्हॉल्व्ह, कॅमेरा रोलच्या डब्या, रिफिली वगैरे साहित्य वापरून तयार केलेले छोटे छोटे पंप हे जर तुम्ही ज्यांचं शिबिर घेणार आहात त्यांच्याकडून करून घेतलंत, तर ती मुलं तुम्हाला इतकी चिकटून बसतील की विचारता सोय राहणार नाही! हे खेळण्यांचं सत्र तर ३-४ तास सहज चालेल. एका दिवशी १।।-२ तास आणि दुसऱ्या दिवशी १।।-२ तास असं नियोजन करा आणि enjoy the party!!

३. आजूबाजूंच्या गोष्टींचे निरीक्षण : आमचा आदित्यदादा या प्रकारच्या गोष्टींमध्ये अगदी वाकबगार

। अभिनंदन... पद्मभूषण पुरस्कार श्रीमती शबाना आझमी (सिनेसृष्टी, कला)
प्रायोजक – श्री. श्रीकांत कुलकर्णी, ठाणे

आहे. त्याने करून घेतलेल्या एका प्रकल्पाची एक गंमत सांगतो. त्याने एका मुलीला फुलपाखरांचे निरीक्षण करायला सांगितले. ते फुलपाखरू ज्या भागात सापडले त्या भागातील सर्व प्रकारची थोडी थोडी फुलं गोळा करायला सांगितली आणि ती एका बॉक्समध्ये ठेवली. दुसऱ्या बॉक्समध्ये एका फुलपाखराला सोडले. ते कोणत्या ठरावीक कोपऱ्यात बसत नाही ना हे पाहून त्या खोक्यात ९-१० प्रकारची फुले टाकली व फुलपाखरू कोणत्या फुलावर बसते ते पाहिले. असे प्रयोग विविध प्रकारच्या फुलपाखरांवर केले तर खूप मजा येते. पण त्याआधी निरीक्षणे नोंदवता आली पाहिजेत. एका झाडावर फुले किती? काही पानांच्या शिरांची संख्या किती? एखाद्या फळात बियांची संख्या किती? फळाचे वजन व सर्व बियांच्या एकत्रित वजनाचे गुणोत्तर काय? एका ठरावीक वेळात (उदा. १५मिनिटे) वाऱ्याने किती वेळा दिशा बदलली? (कागदाचे कपटे कुठे कुठे उडून पडतात यावरून हे शोधता येईल!) ढगांची चित्रं काढून बघता येतील. त्यांचा डोळ्याने दिसणारा आकार व रंग यावरून त्यांचे वर्गीकरण करता येईल. सायकलीचा ब्रेक लागतो म्हणजे काय होतं? अशा प्रश्नांनी भंडावून कधीतरी जायलाच पाहिजे! आपलं विज्ञान शिबिर हे अशा निरीक्षणांसाठी उत्तम संधी निर्माण करणारं बनलं पाहिजे. त्यासाठी तुम्ही तुमच्या शिबिरासाठी आलेल्या मित्रांना आसपास थोडं मोकळं सोडून ३-४ तासांत पुष्कळ माहिती मिळवायला लावू शकाल, हो की नाही?

४. विज्ञान-कथा वाचणे व लिहिणे: या विषयी मी फार काही बोलत नाही. डॉ. जयंतराव नारळीकर, डॉ. संजय ढोले अशा अनेकांच्या विज्ञानकथा आपल्या अंकात येऊन गेल्यात. नारळीकरांचे 'अंतराळातील भस्मासूर', 'यक्षांची देणगी' हे कथासंग्रह; 'प्रेषित', 'वामन परत न आला' या कादंबऱ्या वा त्यातील काही भाग हा विज्ञान शिबिरात वाचायचा नाही; तर मग कुठे वाचायचा बरं?

याला थोडी जोड सर डेव्हिड अटेनबरोंची 'सिक्रेट लाईफ ऑफ प्लांटस' सारख्या माहितीपटांची देता येईल. थोडा यू-ट्यूबचा धांडोळा घेतला तर फार सुंदर माहितीपट,

चित्रपट मिळून जातील आणि मग त्यांची छानशी डी.व्ही.डी. जाळून (म्हणजे 'burn' करून!!!) तुम्ही कोणाच्या तरी घरच्या डी.व्ही.डी.वर दाखवू शकाल. http://ted.com या संकेतस्थळावरील प्रणव मिस्त्री, मायकेल प्रिचर्ड, देब रॉय, हान्स रोझलिंग यांच्या व्याख्यानांचे videos फारच बघण्याजोगे आहेत. त्यावर चर्चा करायची म्हणजे मग फारच मजा येईल!! या सर्व उठाठेवीत तुमचे ४-५तास सहज जाणार बरं का!!

५. गटकार्य: आम्ही ३ गटकार्य फार आवडीने करून घेतो, बरं का! प्लॅस्टिकच्या पातळ पिशवीला चार ठिकाणी दोरे बांधायचे आणि तिचं पॅरॅशूट तयार करायचं. या दोऱ्यांना खाली एक प्लॅस्टिकचा ग्लास बांधायचा आणि त्यात एक अंडं ठेवायचं (न उकडलेलं!!). आणि द्यायची स्पर्धा लावून - पाचव्या मजल्यावरून जरी हे 'पॅरॅशूट खाली सोडलं तरी, कोणाचं अंडं फुटणार नाही ते बघू!' किंवा ५०-६० स्ट्रॉ आणि काही टाचण्या यांच्या साहाय्याने ठरावीक लांबी-रुंदीचा पूल बांधायला सांगायचा गटात आणि मग त्यावर वजन ठेवायचं २-३-४-५किलोंचं! कोणाचा पूल जास्त वजन पेलतो ते पाहायचं! तो गट जिंकला असं जाहीर करायचं!!! या प्रकारच्या गटकार्यांमध्ये - त्या स्पर्धांमध्ये इतकी म्हणजे इतकी म्हणजे इतकी मजा येते; वातावरण इतकं भारून जातं की बास!! याला दुसरा पर्यायच नाही!!! यातही २-३ तास एका गटकार्यासाठी वापरले जाऊ शकतात.

कंटाळ्याचाच कंटाळा यावा, अशी ऊर्जा द्या हो मला।
चैतन्याच्या लहरींवरती उन्मेषाच्या उत्कट माला...॥

६. आडाखे बांधून तपास करणे: दशवार्षिक डी.व्ही.डी. मध्ये तुम्ही पाहिलंत, तर विज्ञान - कृतिपर या प्रकारात 'प्रयोगातून प्रकल्पाकडे' असे बरेच लेख तुम्हाला सापडतील. पाणी उकळण्याचा अभ्यास, लंबकाचा अभ्यास, वर्गीकरण करणे अशा विविध प्रकारचे प्रकल्प तुम्हाला करता येणं शक्य आहे. पाणी उकळायला ठेवल्यावर ते किती वेळात उकळते? त्यात मीठ घातल्याचा परिणाम होतो का? काय होतो? किती होतो? पाण्यावरती तेलाचा थर असेल तर काही फरक पडतो का? असे बदल केले असता आपल्या पाणी उकळण्यासारख्या रोजच्या रोज पाहण्याच्या प्रक्रियेतही बरंच 'शोधण्यासारखं' आहे असं तुमच्या लक्षात येईल. २०११ वर्षातला 'प्रकल्प विशेषांक' तर तुम्ही नक्की पाहा. प्रकल्पाचं - छोट्या प्रकल्पाचं काही ना काही काम ६-७ तासांत सहज करून बघता येण्यासारखं आहे.

अशा अनेक विविध प्रकारची सत्रं असणारं भाऽऽऽऽऽरी विज्ञान शिबिर तुम्हीही घेऊ शकता, हे सांगण्याकरता या लेखाचा प्रपंच केला आहे. तेव्हा तुम्ही असं शिबिर घेऊन दाखवा. मुलं गोळा नाही करता आली तरी तुम्हा मित्रांचा ७-८ जणांचा गट जमवलात आणि तुमच्या स्वत:साठी असं शिबिर घेऊन दाखवलंत तर मला फारच आनंद होईल. या लेखातला कोणताही तपशील - प्रयोग, खेळणी, कथा, निरीक्षणासाठीची कृती, छोटा प्रकल्प यात कुठेही शंका आली; यासाठी लागणारं साहित्य कुठे मिळतं असा प्रश्न आला; माहिती-पट कुठून मिळवू असा काही प्रश्न आला, तर 'छात्र प्रबोधन' च्या कार्यालयात संपर्क साधून माझा संपर्क मिळवा आणि मला कधीही त्रास द्या!! माझा ई-पत्ता खाली दिला आहेच. डोळे उघडून बघायच्या प्रवासात तुम्ही खूप पुढे जाण्यासाठी आणि तुमच्या बरोबर तुमच्या मित्रांनाही पुढे खेचून नेण्यासाठी तुम्हाला खूऽऽप खूऽऽऽऽप शुभेच्छा!!

***

नचिकेत नित्सुरे
nachiket.nitsure@jnanaprabodhini.org
meghnadsaha.dal@jnanaprabodhini.org

ग्रामीण मेळावे

दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी 'छात्र प्रबोधन'च्या ग्रामीण दिवाळी अंकावर सातवी ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी ग्रामीण मेळावे उत्साहात पार पडले. ६ जिल्ह्यांतील २० शाळांमधील १२५० विद्यार्थ्यांपर्यंत या निमित्ताने आपण पोहोचू शकलो. सातारा, सांगली, डोंबिवली, रत्नागिरी, इचलकरंजी व पुणे येथील कार्यकर्त्यांच्या, पालकांच्या पुढाकाराने हे शक्य झाले. विशेष म्हणजे काही शाळांमधील शिक्षकांचाही सहभाग या मेळाव्यामध्ये होता.

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, उत्तम साहित्याचा परिचय व्हावा, गटकार्याचा त्यांना अनुभव मिळावा, सभाधीटपणा वाढावा या दृष्टीने ग्रामीण मेळाव्याची आखणी करण्यात आली होती.

प्रकट चर्चा, गाणी, गोष्टी, मुलाखत, मौनवाचन, हस्तकौशल्ये, अंकामधील साहित्यावर सादरीकरण व साहित्यिकांशी दूरभाषवर गप्पा असा ३ ते ५ तासांचा भरगच्च कार्यक्रम मेळाव्याचा होता.

या मेळाव्यामध्ये विद्यार्थ्यांना खूप गोष्टी शिकता आल्या, अनुभवता आल्या. कृती कौशल्य करण्याकडे विद्यार्थ्यांचा कल असल्याचे जाणवले. साहित्यातील सादरीकरण या प्रकारामुळे मुलांनी 'वर्गासमोर काही सादर करण्याचा अनुभव प्रथमच घेतला.' 'कृषी पर्यटनाची धमाल' या लेखाच्याआधारे विद्यार्थ्यांनी त्यांच्या त्यांच्या गावातील १ दिवसाच्या सहलीचे नियोजन कसे करता येईल हे सांगितले. 'कृषी पर्यटना'विषयीची जागृती होत असल्याचे दिसून आले. 'गावगाड्याची बेरीज-वजाबाकी' या लेखाच्या आधारे गावातील चांगल्या वाईट गोष्टींवरील चर्चा रंगल्याचे जाणवले. चर्चेत मुले हिरिरीने सहभागी होत होती. अशाप्रकारचे मेळावे पुढील वर्षीही मोठ्या प्रमाणावर घेण्याचा मानस आहे. आपल्या शाळेत, गावात अशाप्रकारचे मेळावे घ्यायचा तुम्ही अवश्य प्रयत्न करा. 'छात्र प्रबोधन' नेहमीप्रमाणेच तुमच्याबरोबर आहेच!

– सुलभा कुलकर्णी

। अभिनंदन... पद्‌मश्री पुरस्कार श्री. वनराज भाटिया (संगीत -कला) ।
प्रायोजक – श्री. अजित परांजपे, पुणे

स्वामी विवेकानंद : भारतीय युवकाचा आविष्कार

विवेक घळसासी



वर्ष २०१२-१३ हे स्वामी विवेकानंदांचे शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंती वर्ष. आज इतक्या वर्षांनंतरही त्यांचं स्मरण आपल्याला नित्य होत असतं. स्वामीजींचं 'मोठेपण' या लेखातून जाणून घेऊया.

'स्वामी विवेकानंद' म्हटलं की काय आठवते? सर्वधर्मपरिषद गाजविणारे संन्यासी! 'नरेंद्र' म्हटले की आठवतो, भर दुपारी झाडावर चढून ब्रह्मराक्षस शोधणारा धडपड्या बालक! 'बिले' म्हटल्याबरोबर डोळ्यांसमोर येतो व्रात्य मुलगा! 'वीरेश्वर' हे नाव ऐकताच दिसतो ध्यानस्थ कुमार! हे तर सारे योग्यच आहे. पण एवढेच होते का स्वामीजी?

कुणाही एखाद्याचे एखादे भाषण खूप गाजते. लोकांच्या लक्षात राहते. पण तेवढ्याने कोणी 'विवेकानंद' होत नाही. आपणही व्रात्यपणा करतो. मस्तीही करतो. कधी कधी देवासारखे बसतोही. पण मग आपणही 'मोठे' झालो का? एवढ्याने भागत नाही. स्वामीजींमध्ये आणखी काय होते? कशामुळे ते 'महान' झाले? दीडशे वर्षांनंतरही आपल्याला त्यांची का आठवण होते?

अगदी साधी बाब. आपण सर्वांनी स्वामीजींची प्रकाशचित्रं (फोटो) खूपदा पाहिली आहेत. कोणत्याही प्रकाशचित्रात ते कसे दिसतात? उभे असतील तर थाटात, एखाद्या वीरासारखे! बसलेले असतील तरी ताठ, एखाद्या सम्राटासारखे! आपले शरीर बोलते हे तुम्हाला ठाऊक आहे का? देहबोली म्हणतात त्याला! विचारांची स्पष्टता, आत्मविश्वास, निर्भयता हे सारे गुण, आधी आपल्या देहातून बोलतात. स्वामीजींचे चित्र पाहिले की आपल्यालाही हुरूप येतो. ताजेतवाने वाटते. कारण स्वामीजींची देहबोली तशी आहे. ती प्रेरक आहे. संजीवक आहे.

स्वामीजींनी ही देहबोली कुठून मिळवली? कुठे शिकले ही कला? ही बाजारात मिळत नाही. कुणाकडून शिकताही येत नाही. हीची नक्कलही करता येत नाही. ती आपल्या आतूनच येते. आतून म्हणजे मनातून, विचारातून, चित्तातून! मन, मेंदू, चित्त यांचा संयोग म्हणजेच चारित्र्य! ज्याचे चारित्र्य उत्तम, त्याची देहबोली उत्तम असते. मन, मेंदू, मनगट 'उत्तमच' हवे. स्वामीजींचे चारित्र्य सर्वोत्तम होते. कशामुळे ते सर्वोत्तम झालं असेल बरं? चला, स्वामीजींच्या चरित्राचा शोध घेऊया!

स्वामीजी म्हणत, ''स्वत:वरील श्रद्धा, ईश्वरावरील श्रद्धा हेच महान बनण्याचे रहस्य आहे!'' अगदी खरे आहे. स्वामीजी होते मॅट्रिकमध्ये तेव्हाची गोष्ट! मॅट्रिक म्हणजे शालांत परीक्षा. पण मॅट्रिकमध्ये जाण्यापूर्वी दोन वर्षे त्यांचा अभ्यास मागे पडला होता. कोलकत्याबाहेर ते गेले होते. पिता विश्वानाथांबरोबर 'रायपूरला' ते राहात होते. कोलकत्याला आले आणि थेट मॅट्रिकच्या वर्गात त्यांनी प्रवेश घेतला. तीन वर्षांचा अभ्यास एका वर्षात पूर्ण करायचा होता. तोही एक महिन्यात!

रूढी नि रीती जाचक, त्यांचा काच करूया सैल जरा।
चौकटीतल्या चित्रामध्ये, पुन्हा भरूया अर्थ खरा।।

स्वामीजींनी अभ्यास तर पूर्ण केलाच पण मॅट्रिकमध्ये पहिल्या वर्गात (फर्स्टक्लास) ते उत्तीर्ण झाले. यात आणखी एक विशेष आहे. भूमितीचा अभ्यास त्यांनी २४ तासांत पूर्ण केला. भूमिती स्वामीजींना अवघड वाटे. पण अवघड वाटते तेच आत्मसात करण्यात मजा आहे. स्वामीजींनी हे करून दाखवले.

स्वामीजींकडे कोणत्या देवाचा मंत्र होता? अभ्यासाचा कोणता 'पॅटर्न' होता? च्यवनप्राश खात होते ते, की ब्राह्मी? त्यांना कसे जमले हे? स्वामीजी सांगतात, 'दिवसेंदिवस सतत सराव केला की मनाला स्थिरता लाभते. ही स्थिरता मनाला एकाग्रतेची शक्ती देते. एकाग्रतेने केलेल्या कामात यश येतेच येते.'

एकाग्रता म्हणजे ज्ञानाचा पाया आहे. आपले मन मोकाट जनावरासारखे असते. कशाही आकर्षणाला ते भुलते. दहा वाटा पळत सुटते. आपली नव्वद टक्के विचारशक्ती अशीच वाया जाते. सतत चुका घडतात. उन्हात ठेवलेला कागद पेटतो का? नाही. पण तेच ऊन जर दुर्बिणीतून, भिंगातून एकवटून कागदावर धरले तर कागद जळू लागतो. एकाग्रतेची हीच शक्ती आहे.

स्वामीजी कॅलिफोर्नियात असतानाची ही गोष्ट आहे. एकदा एका नदीकिनारी ते सैर करीत होते. तेथे काही तरुणही होते. नेमबाजीचा सराव करीत होते. एका फळीच्या तुकड्यावर त्यांनी, अंड्याची टरफले बांधली होती. ती फळी नदीच्या प्रवाहात सोडली होती. वाहत्या टरफलांना टिपण्यात तरुण मग्न होते. पण यश येत नव्हते. ते पाहून स्वामीजी हसले.

तरुण म्हणाले, ''हसणे सोपे आहे. तुम्ही दाखवा बरे टिपून!''

स्वामीजींनी बंदूक हाती घेतली. नेम धरला. बघता बघता १०/१२ टरफले फोडली. ''तुम्ही पट्टीचे नेमबाज असणार म्हणून जमले,'' तरुण म्हणाले.

हसून स्वामीजी म्हणाले, ''नाही रे बाबांनो! मी तर आयुष्यात पहिल्यांदाच बंदूक हातात घेतली! पण मन एकाग्र करू शकल्याने मला हे जमले, इतकेच!!''

नेमबाजीच काय, पण तत्त्वज्ञानासारखा कठीण विषयही मनाच्या एकाग्रतेने साध्य करता येतो. स्वामीजींनी अगदी तरुणपणातच तत्त्वज्ञानात गती मिळवली होती. ती पाहून त्यांचे प्राचार्य विल्यम हेस्टी म्हणाले होते, ''तत्त्वज्ञानातील नरेंद्रची गती अगदी असाधारण आहे. सगळ्या जर्मन आणि आंग्ल विद्यापीठात त्याच्या तोडीचा प्रतिभासंपन्न विद्यार्थी सापडणे कठीण!''

स्वामीजींची बुद्धी एवढी उत्तम कशाने झाली बरं? अगदी लहान वयातच 'रामायण', 'महाभारत' यातील उतारेच्या उतारे त्यांनी पाठ केले होते. समजून घेऊन पाठांतर केले की स्मरणशक्ती वाढते. सातव्या वर्षीच 'मुग्धबोध' हे संस्कृत व्याकरणाचे पुस्तक स्वामीजींनी पाठ केले होते. स्वामीजींनी 'गतिमान वाचन कौशल्य' मिळवले होते. कॅमेरा कसा एका 'क्लिक'सरशी सारे दृश्य टिपतो, स्वामीजी तसे ग्रंथाचं पान 'टिपून' घेत. म्हणून तर अगदी शेवटच्या आजारपणातही त्यांनी 'एन्सायक्लोपिडीया ब्रिटानिका' चुटकीसरशी वाचून काढला होता. लोकांना हा चमत्कारच वाटे. पण स्वामीजी म्हणत, ''चमत्कार? अहो, असा चमत्कार तर तुम्हीही करू शकता.'' संयम आणि एकाग्रतेच्या मंत्राने असा चमत्कार कोणीही करू शकेल असे त्यांना वाटे!

नुसती बुद्धी चांगली असून पुरेसे नाही. मनही चांगले हवे. प्रेम, करुणा, सेवाभाव असलेले मन हेच चांगले मन असते. पशुपक्ष्यांविषयी स्वामीजींना खूप प्रेम वाटायचे. कोणाचेही दुःख पाहिले की त्यांचे मन करुणेने भरून यायचे. गरिबांची सेवा करणे, हा तर त्यांचा स्वभाव होता. 'खरा भारत गरिबांच्या झोपड्यात आहे,' असे ते म्हणत.

शिकागो शहरात स्वामीजी राहात होते. एका धनाढ्य व्यक्तीकडे त्यांचा मुक्काम होता. सुखाने भरलेले ते घर

। अभिनंदन... पद्मभूषण पुरस्कार प्रो. डॉ. शांताराम बळवंत मुजुमदार (साहित्य आणि शिक्षण)

प्रायोजक – श्री. विद्याधर सहस्रबुद्धे, डोंबिवली

होते. स्वामीजींची खोलीही तशीच होती. रात्री ते झोपायला खोलीत गेले. मऊशार गादीवर अंग टाकले. पण त्याचवेळी भारतातील गरीब जनतेची त्यांना आठवण झाली. मऊ गादी त्यांना काटेरी वाटू लागली. ते उठले. खिडकीपाशी जाऊन उभे राहिले. त्यांना हुंदके आवरेनासे झाले. आक्रंदून ते स्वत:शीच म्हणू लागले, ''हिंदुस्थानातील माझ्या समाजाचा उद्धार कोण करेल? त्यांना पुरेसे अन्नपाणी कोण देईल? हे आई, त्यांना मदत कशी करावी याचा मार्ग मला दाखव!'' असे होते स्वामीजींचे मन!!

स्वामीर्जींचे वडील-विश्वनाथ दत्त - प्रख्यात वकील होते. वकिली उत्तम चालत होती. पैसा भरपूर येत होता. पण अचानक वडील वारले. होत्याचे नव्हते झाले. खायची भ्रांत पडली. स्वत: उपाशी राहून स्वामीजींची आई-भुवनेश्वरी देवी-नरेंद्रासाठी खायचे चार घास ठेवी. छोट्या नरेंद्रला हे ठाऊक असे. तो आईला म्हणे, ''आई मित्राकडे मी जेवून आलो आहे. तू हे खाऊन घे!'' आणि स्वत: नुसते पाणी पिऊन झोपी जाई. ही परिस्थिती काही मित्रांच्या लक्षात आली. गप्पांच्या ओघात ते घरातून काही खाणे आणून ठेवत तर कधी जेवणाचा आग्रह करत. नरेंद्र म्हणे, ''नुकताच जेवून आलो आहे मी!'' आई-भावंडे उपाशी असताना नरेंद्र कसा खाणार?

स्वामीजींच्या मोठेपणाची आणखी एक खूण होती. भारतमातेबद्दलचे त्यांचे उत्कट प्रेम! सतत भारतमातेचा विचार! सर्वधर्मपरिषदेला जाताना त्यांची आगबोट 'कोबे' (जपान) येथे थांबली होती. बोटीचा पुढचा मुक्काम 'याकोहामा' येथे होता. मधल्या वेळेत प्रवासी जपानमध्ये फिरू शकणार होते. स्वामीजीही 'फिरण्यास' निघाले. कुणीही अशावेळी प्रेक्षणीय स्थळेच पाहील, नाही का? पण स्वामीजी काय बघत होते? 'देशकालस्थितीबद्दल पूर्णपणे जागरूक जपानी लोक' आणि 'इतर देशांतील तोफांपेक्षा काकणभरही कमी नसणाऱ्या जपानने बनवलेल्या तोफा! त्या निर्माण करणाऱ्या जपानी अधिकाऱ्यांचे कष्ट!!' जपान बघून स्वामीजींनी आपल्या शिष्याला पत्र पाठवले. त्या पत्रात ते म्हणतात,

''आपल्या देशामध्ये नवीन रचना निर्माण करण्यासाठी स्वार्थत्यागी तरुणांची अत्यंत आवश्यकता आहे. भुकेलेल्यांच्या पोटाला अन्न मिळावे, निराश्रितांना सहानुभूती मिळावी, सर्व समाज प्रगतिशील व्हावा यासाठी आमरण झटणारे कर्तृत्वसंपन्न तरुण!''

काहीही पाहिले, ऐकले की 'भारत' स्वामीजींना आठवे आणि आठवत तरुण! आजही स्वामीर्जींचे विचार तरुणांनाच साद घालत आहेत.

प्रखर बुद्धी, संवेदनशील मन आणि बलदंड शरीर असलेले स्वामी विवेकानंद म्हणजे खऱ्या भारतीय युवकाचा आविष्कार! स्वामीजींना गाण्याची जशी आवड होती तशीच खाण्या-खिलवण्याची आवड होती. ते जशा सुंदर कविता करीत तसाच चवदार स्वयंपाक करीत! जगातील उत्तम, आधुनिक ते ते आपल्या देशाने स्वीकारावे, असे त्यांना वाटे. त्याचवेळी भारताने जगाला धर्म व अध्यात्माचे ऐश्वर्य द्यावे, असेही त्यांना वाटे. ते संन्यासी होते पण समाजाच्या सुख-दु:खात ते सहभागीही होते. संन्याश्यांनाही समाजसेवेची प्रेरणा त्यांनी दिली. अफाट धैर्याचे ते मूर्तिमंत रूप होते. केवळ ३९ वर्षे आयुष्य त्यांना लाभले. १२ जानेवारी १८६३ रोजी ते कोलकता येथे जन्मले आणि ४ जुलै १९०२ मध्ये, सारे जग जिंकून आलेल्या या योद्ध्या संन्याशाने, कोलकता येथेच देह ठेवला!

***

विवेक घळसासी
१५, वामननगर, जुळे सोलापूर
सोलापूर 413004

सगळे काही मनासारखे घडत नाही, प्रत्येक फूल ऋतूरंगी बुडत नाही।
क्षितिजाची कक्षा जरी घाली साद, मनात आल्याशिवाय पक्षी उडत नाही।।

७ एप्रिल – जागतिक आरोग्यदिन

World Health Organization

- जागतिक आरोग्य संस्थेच्या (World Health Organization-WHO) पुढाकाराने १९५० पासून अंमलबजावणी सुरू.
- २०१२ चा विषय –वृद्धत्व आणि उत्तम आरोग्य राखणं
- २०१२ चे घोषवाक्य– 'उत्तम आरोग्य वाढवी आयुष्यमान'

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात जेवढे आजार तेवढी किंवा त्यापेक्षा जास्त औषधं आहेत, एवढंच काय पण एखादा अवयव (अगदी हृदयसुद्धा) निकामी झाला तर तो बदलता येतो आणि पुन्हा नव्यानं आयुष्य जगता येतं. त्यामुळे माणसाची आयुमर्यादा वाढली आहे. साहजिकच आरोग्यसमस्याही वाढणार आहेत. काही संख्याशास्त्रज्ञांच्या मते, २०५० मध्ये वृद्धांची संख्या कित्येक अब्ज होणार आहे आणि त्यामानाने तरुण, बालकं यांची संख्या अगदी नगण्य राहणार आहे, कारण सध्या जन्मसंख्येचे प्रमाण घटत आहे. म्हणूनच यावर्षीचा विषय वृद्धत्वावर केंद्रित केला आहे. वृद्ध लोक जास्तीत जास्त चांगलं आयुष्य कसं जगतील आणि निरोगी राहून स्वतःच्या कुटुंबासाठी आणि समाजासाठीही कसे उपयोगी पडतील; ह्यासाठी प्रयत्न केले जातील.

तुम्ही काय कराल?

तुमच्या सोसायटीमध्ये किती वृद्ध राहतात? त्यांची वयं (वय वर्षे ६० पासून पुढे) किती आहेत त्याचा तपशील मांडा. त्यांना कोणते आजार आहेत का, असल्यास कोणते, औषधं किती घेतात, कोणत्या पद्धतीचा आहार घेतात? व्यायाम, फिरायला जातात का, झोप लागते का? अशा प्रकारची माहिती गोळा करा आणि नंतर तुमच्या वर्गातल्या सर्व विद्यार्थ्यांकडची माहिती (Data) गोळा करून त्याचं विश्लेषण करण्याचा प्रयत्न करा. अशी माहिती शाळेतल्या सर्व विद्यार्थ्यांना गोळा करायला सांगा. तुम्हाला अजून काय सुचतंय? आरोग्य दिनी संकल्प करा 'निरोगी राहण्याचा'!

– डॉ. कांचनगंगा गंधे

..वाचाल तर वाचाल..

भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांचा १४ एप्रिल हा जन्मदिवस. त्यांचे ग्रंथप्रेम व ग्रंथवाचन अफाट होते. परदेशात गेले असताना जिथे म्हणून चांगली व दुर्मीळ पुस्तके मिळतील ती त्यांनी खरेदी केली. परदेशातील दौरा आटोपून प्रवासी-जलद बोटीने ते भारतात परतले. त्यांचे सामान मालवाहतूक करणाऱ्या बोटीतून मागाहून येणार होते. तीन आठवड्यानंतर रेडिओवर त्यांनी दुःखद बातमी ऐकली. भीमरावांचे सामान घेऊन येणाऱ्या बोटीला अपघात झाला होता. बोटीचा काही भाग समुद्रात बुडाला होता.

ही वार्ता सांगण्यासाठी त्यांचा मित्र त्यांच्याजवळ आला अन् म्हणाला, ''भीमराव, एक वाईट बातमी आहे.''

''ऐकली आहे मी रेडिओवर, मला सांग माझ्या सामानाचं काय झालं?''

''तुमच्या कपड्याच्या सगळ्या बॅगा समुद्रात बुडाल्या,'' मित्र म्हणाला,

''नथिंग इज लॉस्ट,'' भीमराव बेफिकीरीने म्हणाले.

''तुम्हाला मिळालेली प्रशस्तीपत्रके, मेडल्स काही वाचली, काही बुडाली.''

''समथिंग इज लॉस्ट'' भीमराव खिन्नपणे म्हणाले. त्यानंतर क्षणभर आंवढा गिळत त्याचा मित्र पुढे म्हणाला, ''भीमराव, तुमच्या पुस्तकाच्या सगळ्या ट्रंकांना जलसमाधी मिळाली''

''एव्हरथिंग इज लॉस्ट. माझं सर्वस्व बुडालं'' असं म्हणून लहान मुलासारखे भीमराव हमसाहमशी रडू लागले. थोड्या वेळाने मित्र म्हणाला, ''असं काय करता भीमराव. किती रुपयांची पुस्तके होती सांगा. पाच हजार... दहा हजार... तेवढी रक्कम मी देतो.''

''वेड्या, पुस्तकाची किंमत अशी पै-पैशात करता येत नाही - त्यातील विचारधन लाखमोलाचं असतं. अशी पुस्तके आता पुन्हा कुठून मिळणार.''

कुमारमित्रांनो, असे होते बाबासाहेबांचे ग्रंथप्रेम.

– दत्ता टोळ

। दात मजबूत राखण्यासाठी दातांची नियमित निगा राखा ।

प्रायोजक – डॉ. कीर्ती आपटे, पुणे ☎ ९४२२०१७१७५

चित्रगोष्टी ५

चित्रा वैद्य

स्थिरचित्र - २

यापूर्वी आपण स्थिरचित्र या विषयाचा थोडक्यात इतिहास, चित्रकारांनी विकसित केलेल्या विविध शैली, यांची चर्चा केली होती. त्याचबरोबर स्थिरचित्र काढण्यासाठी आवश्यक वस्तूंचे निरीक्षण व शीघ्रचित्रे काढण्याचा सराव करण्याचेही ठरवले होते. त्याप्रमाणे तुम्ही नक्कीच सुरुवात केली असेल.

'स्थिरचित्र' हा चित्रकलेतला एक महत्त्वाचा विषय आहे. यात तुम्हाला समोर मांडलेल्या वस्तूसमूहाचे चित्रण करायचे असते. त्यातील वस्तू मुख्यत्वे दोन प्रकारच्या असतात.

१) निसर्गनिर्मित वस्तू - उदा. फळे, भाज्या, फुले, शंख, दगड इ.

२) मानवनिर्मित वस्तू - उदा. स्वयंपाकघरातील भांडी, ग्लास, बादली, पुस्तक, टोपली, झाडू, कापड इ.

एलिमेंटरी-ईंटरमिजिएट परीक्षेसाठी काही ठरावीक सोप्या वस्तूंची मांडणी केली जाते. परंतु हा विषय परीक्षेपुरता न अभ्यासता त्याची जास्तीत जास्त माहिती आपण करून घेतली पाहिजे.

सर्वात प्रथम हे लक्षात ठेवायला हवं की समोर मांडलेल्या वस्तूंचा समूह आहे तसाच न काढता आपल्या कागदावर तो जास्त सुंदर दिसला पाहिजे. चित्रात आकार, रेषा, रंग, पोत-छायाप्रकाश यांचा कलात्मक दृष्टीने आविष्कार घडला पाहिजे.

रेखांकन : स्थिरचित्र काढायला सुरुवात करण्यापूर्वी कागदाला २ सेंमी.ची कडा हाताने आखून घ्यावी. यात कुठेही भौमितिक साधनांचा उपयोग करू नये. समोर ठेवलेल्या वस्तूसंचाची उंची अधिक असेल तर कागद उभा धरावा व रुंदी अधिक असेल तर कागद आडवा धरावा. कागदावर वस्तूंचे मूलभूत आकार काढून त्यांची जागा निश्चित करावी. वस्तूंचे आकार मोठे असावेत. कागदाचा ३/४ भाग वस्तूंनी व्यापलेला असावा. वस्तूंची मांडणी विस्कळीत असेल तर ती जशीच्या तशी न काढता एकमेकांवर थोडी अंशाच्छादित दाखवावी. यानंतर फिके रेखाटन करून घ्यावे. ते योग्य वाटल्यास अंतिम रेखांकन तपशीलवार करावे. कापडाच्या, वस्तूंच्या सावल्या यांचेही फिके रेखाटन करून घ्यावे.

रंगकाम : स्थिरचित्रे रंगवताना वस्तूंवरील छायाप्रकाश दाखवणे खूप महत्त्वाचे असते. कधीकधी वर्गातील २-४ ट्यूबलाईट, खिडकी, दरवाजा यामुळे स्थिरचित्रावर अनेक बाजूंनी प्रकाश पडतो. यामुळे वस्तू सपाट दिसू लागतात. आपले चित्र अधिक चांगले दिसण्यासाठी अशावेळी, एकाच दिशेने येणारा प्रकाश गृहीत धरून कल्पनेने फिके, मध्यम व गडद छटांमध्ये चित्र रंगवणे आवश्यक ठरते.

जर वस्तू व मागील कापड एकाच रंगाचे असेल तर मागील कापडाचा रंग बदलावा; ज्यामुळे वस्तू उठावदार दिसेल. चकचकीत धातूची वस्तू असल्यास त्यावरील तीव्र प्रकाश दाखवण्यासाठी कागदाचा प्रकाशातील भाग तसाच सोडून रंगकाम करावे.

वस्तूंच्या सावल्या दाखवण्यासाठी ज्यावर ती सावली

कच्चे रेखाटन



पक्के रेखाटन

कंटाळ्याचाच कंटाळा यावा, अशी ऊर्जा द्या हो मला।
चैतन्याच्या लहरींवरती उन्मेषाच्या उत्कट माला...।।



सपाट ब्रशने व स्टिपलिंग तंत्राने केलेले रेखाटन

भोपळ्याची वैशिष्ट्यपूर्ण रचना

पडली आहे त्याच रंगाची गडद छटा, शेवटी मिसळून जाणारी दाखवावी. सर्व चित्र रंगवून झाल्यावर पुन्हा एकदा त्याचे निरीक्षण करणे खूप महत्त्वाचे असते. चित्र उठावदार होण्यासाठी गडद छटा अधिक गडद करावी.

चित्र रंगवण्यासाठी वेगवेगळ्या माध्यमांचा उपयोग करता येतो. ऑइल पेस्टल्स - जास्तीत जास्त छटा असलेली रंगपेटी असल्यास उत्तम प्रकारे चित्र रंगवता येते. एकाच रंगाच्या फिक्यापासून गडदपर्यंत अनेक छटा यात मिळतात. सर्वात उजळभागी पांढरा कागद सोडावा. **पारदर्शक रंग** (ट्यूब अथवा वड्यांचे रंग)- या माध्यमातून रंग फिका करण्यासाठी अधिक पाण्याचा वापर करावा. रंग ओला असतानाच त्यात गडद छटा मिसळावी.

अपारदर्शक रंग - (पोस्टर कलर्स) याचे रंगलेपन जाडसर रंगात करावे व फिका रंग करण्यासाठी पांढरा रंग मिसळावा.

माध्यमांचा एकत्रित वापर- प्रथम फिक्या जलरंगात सपाट रंग देऊन रंग वाळल्यावर पेस्टल्सने त्यावर रंगकाम केले तर वेगळा परिणाम साधता येतो. पेस्टलऐवजी रंगीत पेन्सीलीही वापरून बघाव्यात.

पोत : एखाद्या वस्तूचा गुळगुळीतपणा किंवा खरखरीतपणा

म्हणजे पोत. चित्रात दृष्टीला जाणवेल अशी पोतनिर्मिती करताना विविध प्रकारचे परिणाम साधता येतात. परंतु यासाठी पुष्कळ सराव करणे आवश्यक आहे. ब्रशच्या जाड फटकाऱ्यांनी, ठिपक्यांनी, सपाट ब्रशने, ब्लेड, गोणपाट किंवा चुरगळलेल्या कागदाचे ठसे वापरून इ. अनेक प्रकारे पोतनिर्मिती साधता येते. तर ऑइलपेस्टल माध्यमात तिरप्या रेषा, गोल-गोल आकार, ठिपके, रंग खरवडून इ. प्रकारे पोतनिर्मिती करता येते.

यातील प्रत्येक प्रकार हाताळून पाहाताना खूप गंमत वाटेल, परीक्षेत यात तुम्हाला आवडलेली सोपी पद्धत वापरता येईल. नेहमीच्या सरधोपट मार्गाने चित्र न रंगवता विविध अनुभवांतून मिळणारा आनंद खूप वेगळा असतो. आणि हे सर्व करताना दिलेल्या वेळात आपले चित्र पूर्ण होऊन ते पूर्णपणे वाळले पाहिजे हे मात्र विसरू नका !

***

– चित्रा वैद्य
ए–३/ श्रीकुंज सोसायटी, हनुमान मार्ग,
विलेपार्ले (पू.), मुंबई – ५७
info@artist-chitra.com

। अभिनंदन... पद्मश्री पुरस्कार श्री. प्रभाकर वैद्य (खेळ - शारीरिक शिक्षण)।
प्रायोजक – श्री. सुधीर विष्णु दफ्तरदार, पुणे



सोन्नं - माझ्या मनातलं...

जयश्री काटीकर

सोन्नं... कर्नाटक राज्यातलं, विजापूर जिल्ह्यातलं, जेवरगी तालुक्यातलं एक खेडं. इतर कुठल्याही खेड्यासारखं... अवर्षणग्रस्त, दुष्काळपीडित... !

दिवाळीच्या सुट्टीतले आमचे काही दिवस या सोन्नंसाठी, तिथं राहत असलेल्या आजी-आजोबांसाठी, काका-काकूंसाठी राखीव असत. लहान असल्यापासून जाणत्या होईपर्यंतच्या काळात यानिमित्ताने सोन्नंशी ऋणानुबंध जोडले गेले. तिथली काही एकर शेती आणि घर यांच्या अवती-भवती रेंगाळणाऱ्या या काही आठवणी... जवळजवळ दोन तपांपूर्वीच्या; त्यामुळे काहीशा धूसर, अस्पष्ट... एखाद्या स्लाइड शोप्रमाणे दिसणाऱ्या... प्रत्येक स्लाइडमध्ये वेगळी आठवण, वेगळं दर्शन, वेगळं रूप... सोन्नंचं... मला कळलेलं ! समजलेलं ! भावलेलं !!!

***

सोन्नं म्हटलं की पहिली आठवते ती मड्डी (मळा) ! तिच्या शेजारून लांबच लांब जाणारा, फुफाट्याचा, पिवळट-पांढरट मातीचा लांबलचक रस्ता. रस्त्याच्या दुतर्फा पसरलेली सूर्यफुलांची शेती... तळहाताएवढ्या गोलाकारात तपकिरी-काळपट छोट्या-छोट्या बियांची दाटी... भोवताली दाटीवाटीने असलेल्या पिवळ्या धम्मक, मऊ-रेशमी, नाजूक पाकळ्यांची रेलचेल... ! हिरव्या दांड्यावर दिमाखात उभ्या असलेल्या, पूर्ण फुललेल्या या सूर्यफुलांची शेतात भाऊगर्दी ! सूर्याकडे टक लावून पाहात, तो जसा फिरेल तशी आपली तोंडं वळवणारी सूर्यफुलं जणू पिवळी शाल गावभर पसरत असत. मड्डीच्या बरोबर समोर, रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला एक बुटकं, छोटं, सफेत रंग फासलेलं देऊळ... घरापासून मड्डीपर्यंतचं अंतर असेल फार तर एक-दीड किमी. पण तेव्हा चालत जाताना ते खूप लांऽऽब वाटायचं. गावातल्या, वस्तीतल्या रस्त्यावरून बाहेर पडून या वाटेला लागलं व थोडं चाललं की पाय दुखायला लागायचे. पण मग काही वेळातच लांबवरून हे देऊळ दिसायचं आणि हुश्श व्हायचं. 'मड्डी जवळ आली' हे सांगणारं हे देऊळ म्हणूनच आवडायचं.

***

आमच्या बाकीच्या शेतांपेक्षा मड्डी 'आपली' वाटायची. बाकी

डोलते शिवार, नाचते जवार।
सावली मातीही, हसते उदार।।

सगळी शेतं एकतर खूप लांब, दूर अंतरावर, 'हमारे पहोच से बाहर' होती. आणि दुसरं म्हणजे त्या शेतात आणि त्या आसपासच्या दुसऱ्या कुठल्याही शेतात वेगळेपण असं काहीच नव्हतं. सूर्यफूल, ज्वारी किंवा भुईमुग. मड्डीचं मात्र तसं नव्हतं. डोळ्यांना गारवा देणारी, मन प्रसन्न करणारी, हिरवाई ल्यालेली होती मड्डी ! मड्डीत शिरल्या शिरल्या शेण-चाऱ्याचा एक वेगळाच वास नाकात भरायचा. डौलदार शिंगांच्या एका बैलजोडीच्या विसाव्याची ती जागा होती. मड्डीत चिंचेची ४-५ भली मोठी झाडं होती. रवंथ करत असलेल्या बैलांना मागं टाकून डाव्या हातानं पुढं गेलं की चिंचेचं भलं मोठं झाड येई. जमिनीतून अर्धवट वर आलेली त्याची ओबड-धोबड मुळं ओलांडूनच पुढं जावं लागे. पुढं गेल्यावर नव्यानं खोदलेली विहीर... चौकोनी आकाराची, मोठी... त्यावर कठडे वगैरे काही नव्हतं. त्यामुळे २-४ फूट खोल असलेलं, झाडांची हिरवी सावली मिसळलेलं त्या विहिरीचं पाणी झाडांच्या जाळीतून बरंच लांबूनही दिसायचं. पंपाद्वारे या विहिरीतलं पाणी संपूर्ण मड्डीभर खेळवलं जायचं.

ढेकळांत-पाण्यात खेळता खेळता, मड्डीभर हुंदडताना वेळ पटकन् संपायचा. कधी कुणी वडीलधारे घरून निघताना बांधून आणलेला लाडू-चिवडा काढून देई. तेवढ्यात कुणी गडी माणूस जाऊन विहिरीतून पाण्याचा हंडा भरून खांद्यावरून घेऊन येई. शहरातल्या पाण्याची सवय असल्याने हे विहिरीचं, कुठल्याही रसायनाव्यतिरिक्तचं पाणी पिणं नको वाटे खरंतर...

***

घराच्या फाटकातून बाहेर पडलं की डाव्या हाताच्या खडबडीत - दगडी रस्त्यानं, भरवस्तीतूनही मड्डीत जायला निघालं की रस्त्याच्या दोन्ही बाजूंना छोट्या-छोट्या दगडी घरांची दाटी वाटे. या रस्त्यावरून बैलगाडी जाऊ शकत नसे. बैलगाडीतून मड्डीत जायचं झालंच कधी तर घराच्या मागच्या बाजूनी बुरुजाला वेढा घालून, शाळेसमोरून जावं लागे. डाव्या हाताच्या खडबडीत रस्त्यावरच्या घरांच्या गर्दीत माडी असलेलं एकच घर - म्हणजे एक कुणाचा तरी मठ होता. आजोबा 'मास्तर'म्हणून गावात परिचित होते. खरंतर ते काही गावच्या शाळेत शिक्षक नव्हते की काही नाही; पण शहरातून येऊन इथे स्थायिक झालेला; चार बुकं शिकलेला व अडलेल्याच्या मदतीला येणारा म्हणून त्यांचा गावात बऱ्यापैकी वटही होता. म्हणून कधी आई-बाबा आल्यावर त्यांच्यासोबत या मठात प्रवेश करायची आम्हालाही संधी मिळत असे. मठात गेल्यावर गोडमिट्ट, गुळाचा, काळा चहा मोठ्या थाळ्यात ओतून प्यायल्याचं अंधुकसं आठवतंय.

वस्तीतून जाता-येता जाणारे-येणारे, घरांच्या दारात उभे असलेले 'मास्तरांचे शहरी पाहुणे' म्हणून आमच्याकडे कुतूहलाने बघायचे. काही-बाही विचारायचे. 'कन्नड बरंगिल्ला' (कन्नड येत नाही) हे धृपद आळवण्याइतपतच आमचा इतरांशी संवाद व्हायचा. नाही म्हणायला 'निन्न हसर येनू' असं विचारल्यावर स्वत:चं नावही सांगता यायचं म्हणा...!

***

सोन्नंचं आमचं घर मातीचं. दोन खोल्यांचं. त्याबाहेर मोठी पडवी. वर धाब्याचं छप्पर. वरतून कुणी धावत गेलं तरी खाली माती पडायची. आधी वीज नसताना कंदिल-चिमण्यांच्या आणि नंतर वीज आल्यावरही बल्बच्या मिणमिणत्या उजेडातलं घर ! आमच्या तिथल्या मुक्कामाच्या दिवसांत २-४ वेळा तरी घर सारवण्याचा कार्यक्रम झाला असेल. लोखंडाच्या मोठ्या

। अभिनंदन... पद्मभूषण पुरस्कार प्रो. शशीकुमार चित्रे (विज्ञान आणि तंत्रज्ञान)
प्रायोजक – श्री. अजित भिडे (डायरेक्टर, ॲसेंट हॉस्पिटॅलिटी प्रा. लि.), पुणे

काळ्या-करड्या बादलीत शेण गोळा केलं जायचं. त्यात भरपूर पाणी ओतून ते मिश्रण सरबरीत केलं जायचं. हातातला चुडा दरवेळा मागं सारून आख्खं घर हातानं सारवलं जायचं. डावीकडून-उजवीकडे अर्धगोलात फिरणाऱ्या हाताच्या बोटांची, मनगटापासच्या बांगड्यांच्या ठशांची छानशी नक्षी जमिनीवर उमटायची. नाकावर बोटं धरून आम्ही ही गमतीदार नक्षी पाहात उभं असायचो.

बाहेरच्या पडवीपासून ते थेट घराच्या फाटकापर्यंत दोन्ही बाजूंना मोठे गोठे होते. गोठ्यातली गाई-गुरं दरवेळी आम्ही मोजायचो ! ती कधी ५ भरायची, कधी ८ तर कधी १-२ च ! पाऊस-पीक-पाणी यांवरच बहुतांश गोष्टी अवलंबून असायच्या. दिवसभर हे गोठे तसे रिकामे असायचे. दिवेलागणीच्या वेळी गाई-गुरं चरून परतल्यावर घरालाही एक प्रकारची 'जाग' यायची. गळ्यांतल्या घंटांचे, हंबरण्याचे, शेजार-शेजारच्या बैलांच्या शिंगांच्या टकरीचे, पाय जमिनीवर आपटल्याचे आवाज येऊ लागायचे. हळूहळू घरात मिणमिण दिवे पेटायचे. तरी गोठ्यांमधून काळा-ठिक्क अंधार असायचा. त्यामुळे जसजसा अंधार दाटू लागायचा या आवाजांना गूढ वलय प्राप्त व्हायचं. आणि अचानक मधूनच कधीतरी गोठ्यातल्या गाई-गुरांचे डोळेही चमकायचे ! त्यातच दिवसभर दडी मारून बसलेले असंख्य प्रकारचे किडे, त्यांचा किरकिर आवाज, डास एकदम 'बोलायला' लागायचे. त्यामुळेच ही सोन्नंमधली दिवेलागण काहीशी उदास वाटायची...

***

घराच्या फाटकाबाहेरून उजवीकडे जाणारा रस्ता आमच्या 'ओढ्याच्या' शेताकडे जायचा. शेत बऱ्यापैकी लांब असल्याने या शेतावर जायचं म्हणजे एक मोठा दिवसभराचा कार्यक्रमच असायचा. गाडीला बैल जुंपले जायचे. आजोबा सोबत येणार असतील तर गाडीत खास मापाची तयार करून घेतलेली गादी टाकली जायची. तक्क्या ठेवला जायचा. आम्हीही चेकाळायचो. गाडीतून उगाचच वर-खाली करायचो. आजोबा येऊन बसले की गाडी डकाव-डकाव करत निघायची. शेत-मालावरच्या गप्पा चाललेल्या असायच्या. कन्नडमधल्या त्या गप्पा न कळल्यामुळे आम्ही आपले वाटेतली शेतं-झाडं बघण्यात, दंगा-मस्ती करण्यात गुंग असायचो. काही वेळानं गाडी सावकाश व्हायची. 'आता उतार आला,' आम्ही ओळखायचो. दंगामस्ती विसरून गंभीर व्हायचो. उतारावरून, मोठ्या दगड-धोंड्यांवरून बैलगाडीचे एका बाजूचे लाकडी चाक करकर करत चढायचे. गाडी डावी-उजवीकडे खूप कलायची. आम्ही इकडे-तिकडे गडगडायचो. गाडीतले वडीलधारे

एकेक करून पायउतार व्हायचे. अगदीच अवघड झालं काम तर आजोबाही हातातली काठी सावरत खाली उतरायचे. मग मात्र आमची गंभीरता शिगेला पोहोचायची. आम्हालाही खाली उतरायचे असायचे पण तशी परवानगी नसे. तसंच जीव मुठीत धरून बसावं लागे. डोळे गच्च मिटून, बैलगाडीच्या लाकडी दांड्यांना गच्च पकडून देवाचा धावा सुरू करायचो. कधी एकदा ती वाट संपतीय आणि आपण सहीसलामत पोचतोय असं होऊन जायचं. आणि पाच मिनिटांत तो उतार संपायचाही. ओढ्याच्या शेतात जाता-येताच फार मजा येई. शेतात मात्र एवढं करमत नसे. एकतर ते आकारानं खूप मोठं, पायच दुखायला लागत. शिवाय वरून ऊन मी म्हणत अंगावर कोसळत असे. आणि सूर्यफुलं तरी किती आणि कितीवेळ बघणार? त्यातलं औत्सुक्यच संपत असे.

***

पाटाच्या पाण्यात, कोवळ्या गाण्यात।
उगाच फसावे मायाळू मळ्यात॥

सोन्नंच्या या फ्लॅशबॅक आठवणीत अजून एक स्लाइड नेहमी आठवते. एरवी शहरी जीवनात कधीही अनुभवायला न मिळणारा हा प्रसंग. आजही तो डोळ्यांसमोर जसाच्या तसा उभा राहतो...

एकदा अशीच रात्रीची जेवणं-बिवणं झाल्यावर पांढऱ्या शुभ्र मच्छरदाणीत आजोबा आम्हाला गोष्ट सांगत होते. आम्ही अगदी पेंगुळले होतो. आजोबा एकदम सावध झाले. वरून काहीतरी पडल्याचा त्यांना आवाज आला होता. मग गडबडीनं आम्हाला उठवून बाहेरच्या पडवीतल्या कॉटवर आणून बसवलं गेलं. काकांनी भराभरा मच्छरदाणी, अंथरुण-पांघरुण गुंडाळून पडवीत आणून टाकलं. आजी-काकूही मधल्या दरवाजाला कडी घालून पडवीत आल्या. दिव्याच्या मिणमिणत्या उजेडात खोलीतल्या सामानाची उलथा-पालथ होऊ लागली. तेवढ्यात कशी-काय कोण जाणे पण बाहेरूनही २-४ माणसं आली. आजी काहीतरी कन्नडमधून त्यांना सूचना करत होती. त्या अर्थातच आमच्या डोक्यावरून जात होत्या. पण काहीतरी 'वेगळं' घडलं होतं खास! आम्हाला तर नक्की काय चाललंय तेच कळेना! नुसताच गोंधळ होता. काय करावं ते न सुचून माझ्या धाकट्या बहिणीनं 'सूर' लावला. मग माझंही मुसमुसणं सुरू झालं. अर्ध्या तासाच्या खटपटीनंतर एक चांगला सहा फुटी साप मेलेल्या अवस्थेत शेपटाला उचलून बाहेर पडवीत आणला गेला! बाप रे!! शेतातून आलेल्या भुईमुगाच्या शेंगा सोलून त्याची टरफलं एका भल्या-मोठ्या चाळणीत बंबात घालण्यासाठी ठेवली होती. त्या चाळणीतच बरोबर नेम धरून पडल्यासारखा तो साप छपरातून खाली पडला. आजोबांनाही नेमका 'काहीतरी' पडल्याचा आवाज आला आणि ते सावध झाले... ती टरफलं तिथे नसती तर? आजोबांनी त्या आवाजाकडे दुर्लक्ष केलं असतं तर?... बाप रे... !

***

'कन्नड बरंगिल्ला' हे पालुपद सारखं चालूच असल्याने आजूबाजूची लोकं काय बोलतायंत, आजूबाजूला काय सुरू आहे, हे आम्हाला कळायचंही नाही. भाषेचा हा अडसर समवयस्कांबरोबरही जाणवायचा. शेजार-पाजारच्या पोरं-पोरी त्यांच्या त्यांच्यातच खेळत राहायच्या. त्यांचे आवाज अंगणात येत राहायचे फक्त. ठिगळं लावलेली अर्धी चड्डी, वर तसाच मळलेला सदरा अशी मुलं आणि फाटकं परकर-पोलकं किंवा लांडे फ्रॉक घातलेल्या, झिप्र्या

। अभिनंदन... पद्मश्री पुरस्कार श्री. अनुप जलोटा (कला - भारतीय शास्त्रीय संगीत)।

प्रायोजक –स्टॅटफिल्ड इक्विपमेंट, पिरंगुट, पुणे

अवतारातल्या, कडेवर कुणाला तरी घेऊन असलेल्या मुली... रखरखीत चेहऱ्यांच्या... आमच्यापासून लांबलांबच राहायच्या. मास्तरांच्या घराच्या फाटकाची लक्ष्मणरेषा ना त्यांनी कधी ओलांडली ना आम्ही ती ओलांडण्याचा विशेष प्रयत्न केला. त्यातल्या त्यात कधीतरी एकटी रेणूच फाटकाच्या आत ओसरीपर्यंत येऊ शकली होती. तिच्याशी आमची लगेच गट्टीही जमली होती. भाषा निरपेक्ष खेळण्यात ते २-४ दिवस मस्त मजेत गेले होते. घराशेजारच्या छोट्याशा खोपटात ती राहायची. दिवसाही अंधाऱ्या असणाऱ्या तिच्या घरात आम्ही १-२ वेळा डोकावून आलो. पुढच्या वेळी सुटीत सोन्नला येताना रेणूला भेटण्याची उत्सुकता होती. पण यावेळी दाराबाहेरच्या घोळक्यात रेणू दिसेना. १-२ दिवस वाट पाहिली तरीही पत्ता नाही. तिचा चेहेराही अंधुक आठवत होता. आपण आल्याचं तिला कळलंय की नाही? का सुट्टीत बाहेरगावी गेलीय कुठे? चौकशी केल्यावर कळलं - रेणू गेली... हे जगच सोडून गेली... कायमची. काहीतरी आजार उद्‌भवला, आधी दुर्लक्ष, मग योग्य निदानाचा अभाव आणि मग आवश्यक त्या वैद्यकीय मदतीचाही अभाव... नक्की कुठला आजार, कधी गेली, तिचे आई-वडील आता कुठे असतात?... बरेच प्रश्न मनात उद्‌भवले... पण त्यांची उत्तरं काही मिळू शकली नाहीत...

***

हळूहळू आम्ही 'जाणते' झालो. वयोमानानुसार थकल्यामुळे आजी-आजोबा आणि चुलत भावंडांच्या शिक्षणासाठी काका-काकूही शहरात येऊन स्थायिक झाले. तसतसा सोन्नंचा आणि आमचा ऋणानूबंधही कमी कमी होत गेला. हाती उरल्या त्या फक्त अंधुक-अस्पष्टशा आठवणी...

तेव्हा जाणवलं नाही पण आता मागं वळून बघताना, त्या दिवसांचा विचार करताना जाणवतं... शहरी प्रदूषणापासून दूर शेत-शिवारात, शेणा-मातीच्या वासात, ढेकळा-चिखलात, निसर्गाच्या सान्निध्यात, मोकळ्या हवेत श्वास घेण्याचा आनंद आम्हाला सोन्नंमुळे मिळाला. सोन्नंमुळे आम्हीही 'अनुभवसंपन्न' झालो. राहून राहून एकच वाटत राहतं-तेव्हा त्यावेळी आपल्याला कन्नड येत असतं तर?...

***

– जयश्री काटीकर
एफ-३०१, रिव्हरव्ह्यू रेसिडेन्सी,
सनसिटी रस्ता, सिंहगड रस्ता, पुणे - 51
jayakatikar@gmail.com

२२ एप्रिल – आंतरराष्ट्रीय वसुंधरा दिन

आपण ज्या पृथ्वीवर राहतो, त्यावरचे सर्व जीव (वनस्पती, प्राणी, सूक्ष्म जीवाणू इ.) हे जपले पाहिजेत, नैसर्गिक स्रोतांचा योग्य आणि कमीत कमी वापर करून त्यांच्या वाढीसाठी आणि रक्षणासाठी प्रयत्न केले पाहिजेत. या विचारांनी २२ एप्रिल १९७० रोजी गेलॉर्ड नेल्सन याने 'आंतरराष्ट्रीय वसुंधरा दिन' सुरू केला.

* २०१२ च्या वसुंधरा दिनाचा विषय – चिरंजिवी भविष्यवेध

* २०१२ या वसुंधरा दिनाचे घोषवाक्य – 'वसुंधरेच्या भविष्यासाठी सद्‌सद्‌विवेकबुद्धी जागी ठेवा.'

याचाच अर्थ नैसर्गिक स्रोत वापरताना काळजीपूर्वक वापरा. वसुंधरेचे रक्षण करा. तिला ओरबाडू नका, तरच मानवाचं आणि इतर सजीवांचं अस्तित्व अबाधित राहील.

तुम्ही काय कराल? – नैसर्गिक स्रोत – उदाहरणार्थ, पाणी. त्याचे स्रोत तुमच्या आजूबाजूला आहेत का? विहिरी, तळी, नदी आणि अजूनही पाण्याचे साठे कुठे असतील? तुमच्या शहरात/गावात पाण्याची पंपिंग स्टेशन्स किती आहेत? तिथे पाणी कसं साठवलं जातं? ते आजूबाजूला राहणाऱ्या लोकांना पुरतं का? पावसाळ्यात पावसाचं पाणी किती जण साठवतात? नसल्यास आतापासून प्राथमिक तयारीला लागा (म्हणजे छोटे टँक बांधणं, पिंप तयार ठेवणं वगैरे). २२ एप्रिल रोजी एक संकल्प करा की यंदाच्या पावसाळ्यात पाणी साठवणार आणि वर्षभर पाणी योग्य तऱ्हेनेच वापरणार, पाणी वाया जाऊ देणार नाही. अशाच प्रकारचे इतरही नैसर्गिक स्रोतांची माहिती गोळा करा, वेगळे संकल्प करा आणि वसुंधरा दिन साजरा करा.

उन्हाच्या खाईत..., आंब्याच्या राईत...।
चरती वासरे... वत्सल गायींत...॥

चित्र काढूया नवे नवे...

रेषा जरी तीच ती, रंग भरूया नवे नवे
रंग जरी तेच ते, चित्र काढुया नवे नवे... ।।

कधी झुळूक होवूनी वारा दंगे
झिम्मा झाडांचा वाऱ्या संगे
पान हिंदोळे फांदी संगे
फांदी वरती झुंबड रंगे
पहा रे पाखरांचे थवेच थवे... ।।

नाती जपण्या 'हॅलो' म्हणोनी
तटस्थ उभे संन्यासी 'टॉवर'
माती मागते आभाळाला
'मृगा' पासुनी गंधीत 'शॉवर'
डॉट डॉट ने झेलूया, थेंब थेंब ते नवे नवे... ।।

भरता शाळा, एकरंगी फुलपाखरे
म्हणता खेळा, मैदानावर धावा रे
होवूनी गोळा, पुस्तकांच्या गावा रे
घुमूद्या पानोपानी नव्या युगाचा पावा रे
संगणकाच्या पडद्यावरती स्वप्न रेखूया नवे नवे... ।।

क्षितिजावर 'केशर' येतो
रोज घेवूनी 'सकाळ'
'निळया' मंडपी रानोरानी
हिरवी हिरवी 'माळ'
'गुलाल' उधळुन तळयाकाठी
माखुन घेते 'संध्याकाळ'
रात्रीने आभाळाचे, गाणे चंदेरी आळवावे... ।।

– **प्रभाकर साळेगावकर,** 'वसंत मल्हार', समता कॉलनी, माजलगाव 431131

मुखपृष्ठ चित्रकार

नाव : संदेश शंकर जोशी

जन्म : २२ डिसेंबर १९७०, फलटण

शैक्षणिक पात्रता : जी.डी. आर्ट (अप्लाईड आर्ट) १९९१, अभिनव कला महाविद्यालय, पुणे.

जलरंग माध्यमातून निसर्ग चित्रण करणं जोशी सरांना खूप आवडतं. फोटोवरून निसर्गचित्र काढण्यापेक्षा प्रत्यक्ष त्या स्थळी जाऊन निसर्गचित्रण करणं सरांना महत्त्वाचं वाटतं. कारण समोरचं दृश्य, त्यातले सूक्ष्म बदल, त्यातली मनाला मोहवून टाकणारी रंगसंगती, त्या वेळेचा छाया-प्रकाश एवढंच नाही तर ते वातावरण सगळंच तुमच्यासमोर 'साक्षात' असतं आणि म्हणूनच चित्रातही त्याचा 'जिवंत' आविष्कार होत असतो. निसर्गातली झाडं, पशू-पक्षी, आकाश, माणसं 'साक्षात' आणि म्हणूनच परिणामकारक चितारण्याचा त्यांचा नेहमीच प्रयत्न असतो. मुखपृष्ठावरील 'गुलमोहोर' ही त्यांनी अशाच पद्धतीने चित्रिला आहे. डिझाईन आणि प्रिंटींग क्षेत्रातला आपला व्यवसाय सांभाळून जोशी सर निसर्गातले वेगवेगळे आविष्कार चित्रबद्ध करण्याचा मनापासून प्रयत्न करत असतात.

६५/२० कृतांजली सोसायटी, कर्वे रस्ता, पुणे ४, sandeshjo@gmail.com

। अभिनंदन... पद्मभूषण पुरस्कार डॉ. नोशीर वाडिया (न्युरॉलॉजी)

प्रायोजक – व्ही. व्ही. आर्किटेक्ट, प्रा. लि., पुणे

सैतानाचे बाळ

नीला खेर

लोकांना फसवून, छळून किंवा वाईट मार्गाला लावून सैतान खूप कमाई करत असे. त्याची बाळे त्याच्या कमाईवर मजा मारीत होती. सैतान त्यांना नेहेमी सांगे की, 'आपला व्यवसाय तुम्ही माझ्या देखरेखीखाली शिकून घ्या.' पण सर्वजण नुसतेच उंडारायला चटावले होते. शेवटी सर्वात लहान बाळाने ठरवले की मीपण बाबांसारखा व्यवसाय करायला सुरुवात करेन!

बाळ फिरत फिरत निघाले आणि एका छोट्या गावापाशी आले. एका शेताच्या बांधावर बसून विचार करत असताना त्याने पाहिले की ते शेत मारी-ॲन् या गरीब विधवेचे होते. नांगराला घोडे जोडून ती शेत नांगरत होती.

'वा, फसवायला ही व्यक्ती चांगली आहे. गरीब, त्यातून स्त्री आणि शिवाय विधवा. म्हणजे बनवायला सोपं!' बाळाने विचार केला.

नांगर हाकत-हाकत मारी-ॲन् जेव्हा त्या बाजूला आली तेव्हा बाळाने आजूबाजूची माती तोंडाला फासून चेहेरा भीतीदायक केला आणि 'हाँ ऽऽ' असे गुरकावत मारी - ॲन् पुढे उडी मारली. मारी-ॲन् थक्क होऊन पाहात राहिली. हसावे की रडावे हेच तिला कळेना. पण ती शांतपणे म्हणाली,

''गुड मॉर्निंग्!''

तिकडे लक्ष न देता बाळाने विचारले, ''मी कोण आहे ठाऊक आहे का तुला? मी प्रत्यक्ष सैतानाचे बाळ आहे. हे सर्व शेत खरे तर माझ्या मालकीचे आहे. केवळ उपकार म्हणून तुझ्यासारख्या गरीब विधवेला मी ते कसायला म्हणून दिले आहे.''

मारी-ॲन् गप्प बसून ऐकत होती. ''तर मी काय म्हणत होतो, आता या शेतात जे उत्पन्न येईल, त्यातील काही हिस्सा मला पाहिजे.''

''ठीक आहे. पण मग तूही काहीतरी काम केलं पाहिजेस.''

''माझ्या हुकुमाप्रमाणे ढग, वारा, बर्फ, गारा जात-येत असतात. तू बी पेरलेस की मी हवा उत्तम राहील अशी काळजी घेईन.'' बाळाने थाप ठोकली.

मारी-ॲन्ने न बोलता नुसतीच मान डोलावली आणि शेत नांगरायला सुरुवात केली.

खूप कष्ट घेऊन मारी-ॲन्ने जमिनीची मशागत केली, वेळच्या वेळी बी पेरले. सैतानाचे बाळ लक्षपूर्वक पाहात होते. चार महिने मारी-ॲन्च्या कष्टामुळे शेत जोमाने वाढत होते. अंग धरत होते. कणसे पोसली जात होती. शेवटी कापणीचा हंगाम आला तेव्हा बाळ मारी-ॲन्कडे गेले आणि म्हणाले, ''आता माझा वाटा दे.''

''ठीक आहे. पण तुला माहितीच आहे (बाळाला खरे म्हणजे काहीच माहीत नव्हते.) की रोप दोन्हीकडे वाढते. जमिनीवर व जमिनीच्या खाली. तुला कोणता हिस्सा पाहिजे?''

बाळाने पाहिले होते की बी जमिनीच्या खाली टाकले होते. त्यामुळे ते चट्कन् म्हणाले, ''मला जमिनीच्या खालचा हिस्सा हवा.''

माझ्या पायांत भिंगर, आणि हातांमध्ये काम।
नाही दमाया उसंत, कसा पुसावा मी घाम॥

''ठीक आहे.'' मारी-ॲन्ने कापणी केली. सोन्याच्या लगडीसारखी कणसे गाडीत घालून खळ्यावर नेली. नंतर बाळाने जमीन उकरून मुळे बाहेर काढली व त्यांच्या पेंढ्या बांधल्या.

बाजाराच्या दिवशी मारी-ॲन्च्या रसरशीत, तजेलदार गव्हाला चांगला भाव आला. तालुक्याच्या गावी विक्री झाल्यावर मारी-ॲन् तेथील एका चांगल्या बोर्डिंग स्कूलवर गेली, फी भरून आपल्या मुलांची तिने नावे नोंदवली. परत येताना तिला दिसले की सर्व बाजार उठण्याच्या बेतात आहे आणि सैतानाचे बाळ घसा खरवडून -खरवडून लोकांना गव्हाच्या मुळांच्या पेंढ्या विकण्याचा प्रयत्न करीत आहे. काही न बोलता मारी-ॲन गावी परतली.

दुसऱ्या दिवशी बाळ तिच्याकडे गेले व म्हणाले, ''तू मला चांगलेच फसवलेस.''

''असं कसं म्हणतोस? तुझा वाटा तू स्वत:च निवडलास.''

''ठीक आहे. आता या वर्षी शेत पिकवणार आहेस ना?''

''होय तर!''

मारी-ॲन् ने खूप मेहेनतीने जमीन कसली व त्यात बटाट्याची रोपे लावली. सैतानाचे बाळ पाहात होते. चार महिने मारी-ॲन् खूप राबली. रोपे तरारून वाढताना बाळ बांधावर बसून लक्ष ठेवीत होते. कापणीचा हंगाम आला.

''या वेळी मला जमिनीवरील ही भरघोस वाढलेली रोपे हवीत. आधी मी कापणी करून माझा हिस्सा घेतो.'' असे म्हणत बाळाने उत्साहाने बटाट्याची रोपे कापून नेली. नंतर मारी-ॲन्ने जमीन खणली, गरगरीत पोसलेले बटाटे काढून पोत्यात भरले व तालुक्याच्या गावी बाजाराला नेले.

ते सुंदर बटाटे हा हा म्हणता खपले. ते पैसे मारी-ॲन्ने बँकेत भरले. मुलांच्या शाळेत जाऊन फी भरली. मुलांना खाऊ दिला आणि आनंदाने परत निघाली. परतण्याच्या वाटेवर तिनं पाहिलं तर बाळाने बटाट्याच्या पाला- पाचोळ्याच्या पेंढ्या बांधून विकायला ठेवल्या होत्या. बाळ घसा खरवडून ओरडत होते. लोक येता-जाता हसत होते आणि त्याची चेष्टा करत होते. काही न बोलता घोड्याला टाच देऊन मारी-ॲन् गावी परतली.

दुसऱ्या दिवशी सैतानाचे बाळ संतापाने थरथरत तिच्यापुढे हजर. आजतर भयंकर दिसण्यासाठी त्याला तोंडाला मातीही फासावी लागली नाही.

''तू मला याही वेळेस फसवलेस!''

''कसं काय? शेत मी नांगरले. रोपे मी लावली. पिकाची काळजी मी घेतली. कोणता वाटा हवा ते तू स्वत: ठरवलंस आणि आता मात्र मी तुला फसवलं असं का म्हणतोस?''

जरा थांबून, आवाजात मार्दव आणून मारी-ॲन् शांतपणे म्हणाली,

''खरं सांगू का? तू केवळ पिकाचा कोणता हिस्सा हवा या बाबतीतच चुकीचा निर्णय घेतलास असं नाही; तर कोणत्या व्यक्तीला छळायचं आणि फसवायचं; याही बाबतीत चुकीचा निर्णय घेतलास. आता यापुढे हे लक्षात ठेव की सचोटीने कष्ट करणाऱ्याला प्रत्यक्ष सैतानही फसवू शकत नाही. अशा व्यक्ती निर्भयपणे जगू शकतात!''

***

– नीला खेर

एकांत सहनिवास, ७७३/८,
डेक्कन जिमखाना, पुणे 411004

(Le Diable et le Payan
या फ्रेंच कथेचे स्वैर रूपांतर.)

श्रद्धांजली



'छात्र प्रबोधन'च्या सभासदांना वाढदिवसाची शुभेच्छा पत्र पाठविण्याचे काम मनापासून करणाऱ्या, छात्र प्रबोधन विभागात दीर्घकाळ असणाऱ्या ज्येष्ठ, उत्साही सदस्या सौ. सुनितातार्ई धोडपकर यांना सौर ६ फाल्गुन १९३३ (२५ फेब्रुवारी २०१२) रोजी वयाच्या ६९ व्या वर्षी देवाज्ञा झाली. उत्साही, हसतमुख, रसिक आणि अनेकांवर मनापासून प्रेम करणाऱ्या सुनितातार्इंना 'छात्र प्रबोधन' परिवारातर्फे श्रद्धांजली.

। अभिनंदन... पद्‌मश्री पुरस्कार श्री. वनराज भाटिया (संगीत -कला)।
प्रायोजक – श्री. चिंतामणी बने, डोंबिवली

॥ उजळती वाट ॥

लेखांक – ६

सद्गुरुसेवा

– डॉ. स्वर्णलता भिशीकर

प्रिय चारूहास,

आज तुला पत्र लिहिताना मी खूप आनंदात आहे. कारण सांगू का? मला आज शमाताई भेटली सकाळी. तू म्हणशील की ही कोण शमाताई? सांगते सांगते सगळं सांगते. पण त्याआधी यानिमित्ताने विद्याव्रतातलं पुढचं व्रत - **सद्गुरूसेवा**, तुला मी आज सांगणार आहे बरं! गुरू कोणाला म्हणायचं आणि त्यांची सेवा करायची म्हणजे नक्की काय याविषयी मी आज पत्रसंवाद साधणार आहे.

हं, तर ही शमाताई कोण? शमाताईने मला लहानपणी पोहायला शिकवलं, चारू. आणि त्याबरोबर आणखी कितीतरी गोष्टी! माझी ती एक गुरूच आहे, असं समज ना! इतर मुलांप्रमाणेच मी प्रथम टिळक तलावावर पोहणं शिकायला गेले आणि पाण्याची खूप भीती वाटली. शमाताईने मला धसमुसळेपणाने पाण्यात ढकललं नाही. ती स्वत: पाण्यात जाऊन उभी राहिली. माझा हात धरून हळूच मला पाण्यात घेत म्हणाली, 'हे बघ, पाण्यात घाबरण्यासारखं काही नसतं! हळूहळू तुला मजा वाटेल; तिने हलकेच मला पाण्यावर पालथं केलं नि हातपाय मारायला सांगितले. अशी माझी पाण्याची भीती हळूहळू तिने कमी केली. माझ्या पोटाखाली तिचा आधाराचा हात होता; तो तिने कधी काढून घेतला नि मी सुळसुळ पोहायला कधी लागले ते मला कळलंच नाही. पाण्यावर उताणं पडून सूर्याची किरणं मिटल्या डोळ्यांवर कशी घ्यायची हे तिनं मला दाखवलं. जणू ते पाण्यावरचं शांत ध्यानच! शमाताईने आम्हा मुलांवर खूप प्रेम केलं. शाबासकी दिली तशीच रागावली पण! एकमेकांची काळजी कशी घ्यायची; हे आम्ही तिच्याकडून शिकलो.

चारू, अशी कितीतरी चांगली माणसं, आपापल्या विषयांत जाणकार असलेली असतात. खूप प्रेमाने, युक्तीने आपलं कौशल्य, आपली विद्या इतरांना देणारी माणसं आपल्या आयुष्यात येतात. त्यांना आपण 'गुरू' म्हणतो. काही माणसं आपल्याला प्रत्यक्ष भेटत नाहीत पण वर्तमानपत्रातून, पुस्तकांमधून भेटतात. आणि ती आपल्याला खूप आवडतात. आपण त्यांच्याकडूनसुद्धा शिकतो.

कितीतरी सुंदर पुस्तकांमधून आपण अनके गोष्टी शिकतो. म्हणून पुस्तकं किंवा ग्रंथ हेही गुरूच म्हटले पाहिजेत. आण्णा हजारे हे भ्रष्टाचाराविरुद्ध दंड थोपटून उभे असलेले थोर समाजसेवक. सैन्यात असताना आपल्या सहकाऱ्यांचा मृत्यू त्यांनी पाहिला. मन उदास असताना रेल्वे स्थानकावर विवेकानंदांचं एक छोटं पुस्तक त्यांच्या हाती आलं आणि त्या पुस्तकाने त्यांना आयुष्याची दिशा दाखवली. पुस्तकच त्यांचे गुरू झाले. आपला 'गीता' ग्रंथ सुद्धा अनेक लोक गुरुस्थानी मानतात. शीख लोकांचा जो धर्मग्रंथ -'गुरूग्रंथसाहेब' तो त्यांचा पुस्तकरूप गुरूच आहे.

काही चित्रपटांचे नायक किंवा नायिका सुद्धा आपल्याला शिकवतात. 'साउंड ऑफ म्युझिक' या चित्रपटातली दंगेखोर मुलांची ती छोटीशी शिक्षिका. 'I have confidence in my confidence' असं गाते तेव्हा आपल्याला आत्मविश्वासाचे पाठ आपोआप मिळतात. काही इतर चांगल्या मराठी-हिंदी-इंग्रजी चित्रपटांची उदाहरणं तूही देऊ शकशील.

संगीत आणि नृत्य या क्षेत्रात तर गुरू आणि शिष्य यांच्या नात्याला खूप महत्त्व असतं. पूर्वी शिष्य गुरूंच्या घरी राहात, त्यांची सेवा करत आणि संगीतसाधना, नृत्यसाधना करत. पं. भीमसेन जोशी

> **'सद्‌गुरुसेवा'** हे व्रत हळूहळू आचरणात आणण्यासाठी कोणते संकल्प कराल?
> * मोठ्यांची चरित्रे मी आवर्जून वाचीन.
> * गुरुजनांबद्‌दल कळत-नकळतही माझ्याकडून अनादर होणार नाही, याची दक्षता घेईन.
> * मी मोठ्या माणसांना उलट उत्तर देणार नाही.
> * इतरांच्यातल्या चांगल्या गोष्टी मी जाणीवपूर्वक आत्मसात करण्याचा प्रयत्न करीन.

गुरूंच्या घरी राहून गाणं शिकले. प्रसिद्ध गायिका किशोरीताई आमोणकर यांच्या आईच त्यांच्या गुरू होत्या.

आप्पा पेंडसे यांचं नाव तू ऐकलं असशील. त्यांनी 'ज्ञान प्रबोधिनी'ची स्थापना केली. ते मोठे शिक्षणतज्ज्ञ होते. त्यांच्या घरी अनेक विद्यार्थी राहात. त्यांना ते गणित, इंग्रजी, फिजिक्स असे विषय शिकवत. पण त्यांच्यासोबत राहणं हेच एक मोठं शिक्षण असे. ते स्वत: देशभक्तीने भारलेली स्फूर्तिगीतं त्यांच्या प्रभावी आवाजात गात आणि मुलांना गायला शिकवत. त्यांच्याकडे वेगवेगळ्या प्रकारचे लोक येत. त्यांच्याशी ते कसे बोलतात, दुसऱ्यांची सुखदु:ख कशी जाणून घेतात, देशाच्या प्रश्नांवर विचार, चर्चा कशी करतात हे आम्ही पाहायचो आणि त्याचा आमच्या मनावर खोल ठसा उमटायचा. त्यांची कामाची पद्धत आम्ही पाहायचो. त्यांनी एखादं काम करायला घेतलं की त्याचा ध्यासच त्यांना लागत असे. ते तडीला जाईपर्यंत अडचणींची शर्यत ते कसे पार करत हे पाहाणं, त्यात त्यांना मदत करण, त्यांच्याबरोबर अशी वेगवेगळी कामं करणं; हेही मोठं शिक्षण असायचं.

ज्यावेळी आपल्या पंजाब प्रांतातले काही शीख बांधव देशातून फुटून वेगळ्या देशाची - खलिस्तानची मागणी करत होते तेव्हा आप्पांना फार वाईट वाटे. आम्हाला ते म्हणत, 'पंजाबला जा ! हा देश एक-अखंड आहे. आपण तो तसाच राखला पाहिजे, हे तिथल्या लोकांना सांगा !' मराठी लोकांना पंजाबची काळजी असली पाहिजे, सर्व देशाची काळजी आपण केली पाहिजे, हे त्यांच्यामुळे आम्ही समजू शकलो. पोहणं शिकवणारी ताई ही गुरू आहे तर देशाचे प्रश्न कसे सोडवले पाहिजेत हे सांगणारे आप्पा सद्‌गुरू म्हटले पाहिजेत!

छोटा एकनाथ नावाचा पोरका मुलगा देवगिरीचे सुभेदार जनार्दनपंत यांच्याकडे राहिला होता. त्यांनी त्याच्यावर मुलासारखं प्रेम केलं. त्याला एका प्रांताचा कारभार करायला शिकवला. लढाईसाठी घोड्यावर बसायला शिकवलं आणि उपासनाही शिकवली. पुढे ते संत एकनाथ म्हणून आपल्याला सगळ्यांना माहीत झाले.

सद्‌गुरू आपल्याला आपल्या भोवतीच्या जगात यश कसं मिळवावं हे सांगतात आणि उपासनेने देवाशी ओळख करून घ्यायलाही शिकवतात. अशा गुरूंवर शिष्य प्रेम करतील नाही तर काय? गुरूंवरचं प्रेम शिष्य अनेक प्रकारे प्रकट करतात. साधं दसरा-संक्रांतीला त्यांच्या घरी जाणं, त्यांनी सांगितलेली लहानमोठी कामं करणं, त्यांच्याबरोबर वेगवेगळ्या ठिकाणी जाणं आणि त्यांचं काम आपण पुढे चालवणं ही सगळी सेवाच आहे.

चारू, निसर्ग सुद्धा आपला गुरूच आहे. निरभ्र निळं आकाश आपल्याला सांगतं की तुझं मन तू असंच निर्मळ ठेव. झुळझुळ वाहणारा हसरा झरा आपल्याला सांगतो की नेहमी आनंदात राहा. फळाच्या भाराने लवलेला आंबा आपल्याला सांगतो की खूप गुणांची संपत्ती तुझ्याकडे असली तरी नम्र राहा. नक्षत्रांची फुललेली रात्र पाहिली आहेस का तू? त्या चमचम करणाऱ्या तारका आपल्याला सांगतात की कितीही दाट अंधार असला, कितीही अडचणी असल्या तरी त्यावर मात करून आपण प्रसन्न, प्रकाशमान राहायचं असतं. अशी ही सृष्टी आपली गुरू असते. तिचं रक्षण करणं ही सुद्धा सद्‌गुरूसेवाच आहे. श्रीरामकृष्ण एकदा म्हणाले,

। अभिनंदन... पद्‌मश्री पुरस्कार श्री. निरंजन प्राणशंकर पांडे (सामाजिक कार्य)।

प्रायोजक - डॉ. गीतांजली, डॉ. सिद्धार्थ पटवर्धन, नॉटिंगहॅम, इंग्लंड

''देवासाठी फुलं काढायला मी गेलो तर देव म्हणाला, 'अरे ही फुलझाडं म्हणजे ठिकठिकाणी बांधलेले फुलझेले आहेत. त्यांनी माझी पूजा झालीच आहे. मग तू फुलं का तोडतोस?'''

चारू, लोकांना हे कळत नाही म्हणून तर ते झाडाचं, पानाफुलाचं वैभव ओरबाडत असतात. होय ना?

आपले आई-वडील तर आपले पहिले गुरू असतात. त्यांना आपण न चुकता रोज नमस्कार केला पाहिजे. त्यांना त्यांच्या कामात शक्य असेल ती मदत आपण केली पाहिजे. आई आपल्यासाठी किती गोष्टी करते! आजारात उशाशी जागते, आवडीचं खायला करून देते. रुसलो तर समजूत काढते. जे घरात आणलं असेल ते सर्वांनी मिळून घ्यायचं, हे ती शिकवते. एकट्या आईकडून किंवा बाबांकडूनही शिकण्यासारख्या खूप गोष्टी असतात. बाबांच्या मागे किंवा समोर स्कूटरवर बसता बसता आपण स्कूटर कधी शिकतो ते आपल्याला कळत नाही. आपल्या आईवडिलांना समजून घेणं, ते सांगतील ते ऐकणं, स्वतः नेहमी अभ्यास करणं, चांगलं वागणं हीही त्यांच्या प्रती एक प्रकारची सेवाच असते, चारू. तुला काय वाटतं?

चारू, पूर्वीसारखं आता आपण गुरूगृही जाऊन राहात नाही तर आपापल्या घरीच राहातो आणि शिक्षण घेतो. त्यामुळे गुरूची 'सेवा' करायची म्हणजे काय असा आपल्याला प्रश्न पडतो. सेवा म्हणजे गुरूंना जेवायला वाढणं, त्यांची शुश्रूषा करणं, हातपाय चेपणं नाही. गरज पडली तर तेही करायचंच पण खरी सेवा म्हणजे गुरूचं व्यक्तिमत्त्व, त्यांच्या शक्ती, त्यांचे विचार समजून घेणं आणि त्याप्रमाणे प्रत्यक्ष काम करणं! त्यालाच विद्याव्रतात 'सद्‌गुरू सेवा' असं म्हटलं आहे.

गुरू आणि शिष्य यांचं नातं फार सुंदर असतं. त्यात आई-वडिलांचं वात्सल्य, मैत्रीतला खेळकरपणा, वटवृक्षाची सावली, आणि कोवळ्या उन्हाची ऊब असते. गुरू केवळ शब्दांनी शिकवत नाहीत; त्यांच्या वागण्याकडे पाहून शिष्य अनेक गोष्टी शिकतो. ते दृष्टीतून आणि स्पर्शातून प्रेम देतात. वाणीतून आणि कृतीतून ज्ञान देतात. त्यांचं जीवन म्हणजे उत्तमोत्तम गुणांचं निर्मल, तेजस्वी प्रतिबिंब असतं. शिष्याला ते इतकं देतात की त्या ऋणातून उतराई होणं शिष्याला शक्य नसतं. परंतु आपल्या कृतज्ञतेचं प्रतीक म्हणून तो फूल ना फुलाची पाकळी, प्रेमादराने गुरूला अर्पण करतो त्याला 'गुरुदक्षिणा' असं म्हणतात.

समर्थ रामदासांनी सद्‌गुरूंची आणि सत्‌शिष्याची म्हणजे उत्तम गुरूची आणि उत्तम शिष्याची लक्षणं सांगितली आहेत. आपल्याला सर्वांना चांगले शिष्य व्हायचं आहे. म्हणजे गुरू आपल्याला जे सांगतील ते आपण नीट समजून घ्यायचं आहे, त्यावर विचार करायचा आहे आणि त्यानुसार कृती करायची आहे. गुरूने सांगितलं की 'सत्यानं वाग'; तर त्यावर शिष्याची श्रद्धा हवी, तसं वागण्यासाठीचं धैर्य, बळही हवं.

एकाच वेळी शिष्याकडे चिकित्सा करण्याची शक्ती आणि अपरंपार श्रद्धा हवी. स्वामी विवेकानंदांजवळ आणि अनेक महापुरुषांजवळ बुद्धी आणि श्रद्धा या दोन्ही गोष्टी होत्या. म्हणून ते जगाला वंदनीय झाले आहेत.

चारू, जे यश आपलं आहे असं वाटतं ते या साऱ्या गुरूंनी आपल्याला मिळवून दिलेलं असतं, म्हणून त्यांच्याविषयी नेहमी कृतज्ञता असावी. गुरूंची आठवण असावी म्हणून आपण आषाढातली पौर्णिमा गुरूपौर्णिमा म्हणून साजरी करतो. गुरूंच्या ऋणाची आठवण ठेवावी. त्यांच्या सांगण्याप्रमाणे वागायचा प्रयत्न करावा. हे आहे विद्याव्रत संस्कारातलं पाचवं व्रत **सद्‌गुरूसेवा.** तुला याविषयी काय वाटतंय ते मला नक्की कळव.

तुझी
लताताई

***

– स्वर्णलता भिशीकर
ज्ञान प्रबोधिनी, हराळी, डाक तोरंबा,
ता. लोहारा, जि. उस्मानाबाद

काळोख पडेल तेव्हा, हळूच उजळून ये।
दिपवून टाकू नकोस, इतपत जवळून ये।।

१६ मार्च २०१२... एव्हरेस्ट शिखर सर करण्यासाठी पुण्यातून 'गिरिप्रेमीं'ची तुकडी रवाना झाली. मा. राष्ट्रपती प्रतिभाताईंच्या हस्ते भारताचा राष्ट्रध्वज घेऊन ही सेना शिखराकडे कूच करते आहे.

त्या वीरांना 'छात्र प्रबोधन' परिवारातर्फे शुभेच्छा!

(ही कविता एव्हरेस्ट मोहिमेत सहभागी भूषण हर्षे यांच्या आईने लिहिली आहे.)

शुभास्ते पन्थानः सन्तु ।

गिरिप्रेमीच्या गुणी वीरांनो, भारतभूच्या प्रिय पुत्रांनो,
उंच उंच शिखरे चढण्याचा ध्यास तुम्हा निशि-दिनी
प्रवास तुमचा सुखकर होवो हीच शुभेच्छा मनी ।।

ध्येयसूर्य हा सदैव तुमच्या मनोनभीं तळपू दे
निश्चय, निष्ठा, परिश्रमांची किरणप्रभा उजळू दे
पुढे पुढे चालता नवी घ्या आव्हाने झेलुनी ।।

शक्ति-युक्ति अन् बुद्धिबलाची साथ तुम्हा लाभू दे
सावधतेने प्रयत्न करता सहकार्य असू दे
मार्ग आक्रमा, मनःशक्तीचा शोध नित्य घेऊनी ।।

वज्रता नि नम्रता तनामनात जागू दे
अथक त्राण पावलात क्षणाक्षणास वाढू दे
धवल यशाचे शिखर गाठण्या धैर्य असू द्या मनी ।।

पृथ्वीचा जो मानदंड, त्या नगाधिराजाचे
गगनचुंबी तो उन्नत माथा वैभव हे साचे
अभिमानाने ध्वजा फडकवा नतमस्तक होऊनी ।।

– **भाग्यश्री हर्षे**, २/२२, त्रिमूर्ती हौ. सोसा., शिवतीर्थनगर, कोथरुड, पुणे – ३८

। अभिनंदन... पद्मभूषण पुरस्कार डॉ. एम. एस. रघुनाथन (विज्ञान आणि तंत्रज्ञान)।
प्रायोजक – डॉ. मुकुंद करंबेळकर, चाळीसगाव

सुट्टीतील शाळा

पाठीवरचं काय किंवा मनावरचं काय, ओझं तसं नकोच असतं. जे नको असतं, ते टाळताही येत नाही हे जरी खरं असलं तरी, आपल्या नकळत काही ओझी गळून पडतातही. तर कधी कधी त्याची वाट बघावी लागते; वाट बघण्यातही फार आनंद असतो. कारण त्यात अेक वेगळीच ओढ असते. सुट्ट्यांची ओढ तशीच, मोठ्या आनंदाची; ती ओढ इथं- तिथं सगळीकडं सारखीच.

मी शाळेत होतो तेव्हा दप्तराचं ओझं हातात असायचं. झोऱ्या किंवा पिशवी. पाठ मोकळी असायची; मारासाठी अथवा शाबासकीसाठी. पाठीवरचं असो की हातातलं, ओझं ते ओझंच. पण ते ओझं वाटायचं नाही. अक्षरांची ती 'कावड' असे; उद्याची 'कवाडं' उघडून देणारी!

ते काहीही असलं तरी सुट्ट्या ! म्हणजे सुट्ट्या. दिवाळीची सुट्टी, उन्हाळ्याची सुट्टी म्हटलं की, मनाला मोकळं वाटायचं. आपण 'आपले राजे' अशी भावना असायची. ते राजेपण फार टिकायचं नाही; पण मनाला बरं वाटायचं. आमच्या त्या काळात सुट्टीतले 'वर्ग' नसायचे. तेवढ्यापुरता तरी 'वर्ग'कलह आनंदाच्या कल्पनेत इकडं-तिकडं भटकायचा.

आमच्या वेळी सुट्टीचा काळ म्हणजे गाठीभेटी. आपलं आजोळ किंवा आईचं आजोळ किंवा बहिणीचं गाव अशी 'टूर'. फक्त 'टूर-ट्रॅव्हल' नाही. सहसा पायीच, क्वचित बैलगाडी. मनाच्या मालकीचा पैस असायचा. आता पैसा आला आणि पैस लोपला. अशा या काळात सुट्ट्यांनाही सुटका नाही.

कधी कधी का होईना मनाला मोकळीक हवी असते; आमच्या वेळी ते होतं. गरिबी होती पण गगनही होतं. मोकळ्या मनानं उडत राहायचं-विहरत राहायचं आकाश, म्हणजे सुट्ट्या. आमची गरिबी असली तरी आईचं आजोळ तसं काही वाटू द्यायचं नाही. आईच्या मामाचा म्हणजे आजाचा फार धाक. त्या धाकातही प्रेम होतं. किती पिकं, किती ढोरंवासरं, किती बैलजोड्या, किती माणसं; पण घर अेकच. मिळून- मिसळून. मनाची ती खरी 'बालभारती'. हे सुट्टीतच साधायचं. कधी कधी बहिणीच्या गावी जायचो. वर्गातले मित्र भेटायचे तिथे. त्याचंही आकर्षण. असं सगळं सुट्टीत असायचं. अभ्यास वगळून पण अभ्यासातली माणसं धरून!

आता अंगण नसलं तरी सदनिका आहेत, नाती नसली तरी निवास आहे, मन नसलं तरी माणसं आहेत. अशा वातावरणात, सुट्टीतले संवाद, सुट्टीतले सहवास, हीच सहजीवनाची शिदोरी असते. तोच अभ्यासक्रम असतो अंत:करणाचा. सुट्टीतही ही शाळा भरलेलीच असते; न पुस्तक, न पाढा, न प्रार्थना आणि तरीही त्यापलिकडचे पाठ्यक्रम! सुट्टीतली शाळा ही फक्त भरणारी, न सुटणारी. म्हणून शाळेलाही सुट्टी आवडते.

***

– फ. मुं. शिंदे

यमुना, ८३ म. गांधी नगर, पद्मपुरा, औरंगाबाद 413005

झोका जाय उंच उंच, जणू क्षितिजाशी पाय।
अंतरात खळबळ, असा मध्ये अंतराय।।

(७) प्रकल्पांची कमाल
शिकण्यातली धमाल

प्रकल्पाचे मूल्यमापन

– विवेक पोंक्षे

फेब्रुवारी महिना आला की शाळांमध्ये विज्ञान प्रदर्शनांची गर्दी सुरू होते. २८ फेब्रुवारी म्हणजे विज्ञान दिन. थोर भारतीय वैज्ञानिक सी. व्ही. रामन यांनी त्यांचा 'रामन परिणाम' हा शोध प्रथम प्रसिद्ध केला तो हा दिवस. भारतात हा दिवस 'विज्ञान दिवस' म्हणून साजरा होत असतो. अनेक शाळांमध्ये या निमित्ताने मुलांनी केलेल्या विज्ञान प्रकल्पांचे प्रदर्शन मांडलेले असते. अशाच एका प्रदर्शनात मी गेलो होतो. प्रदर्शनात प्रयोग मांडले होते; प्रतिकृती ठेवल्या होत्या; वक्ते होते आणि त्याचबरोबर प्रकल्प वृत्तेही ठेवली होती. चांगल्या प्रकल्पांना पारितोषिके जाहीर झाली होती. पारितोषिके मिळून ज्यांचे कौतुक झाले होते; ती पोरे खुशीत होती. तर बरीच सारी खट्टू झाली होती. वशिलेबाजीमुळे दुसऱ्याला बक्षीस मिळाले आणि आम्ही मेहेनत करूनही बक्षीस का मिळाले नाही, याच्या चर्चा सुरू होत्या. ज्यांना बक्षिसं मिळाली होती; ती मुलं येणाऱ्या प्रत्येकाला उत्साहाने प्रकल्प दाखवत होती तर बक्षिसे न मिळालेल्या मुलांचे प्रयोग, साहित्य, तक्ते आणि प्रतिकृतीसुद्धा उतरलेल्या चेहऱ्यांनी प्रदर्शनात निव्वळ हजेरी लावून उभे होते.

मित्रांनो, प्रकल्पंना बक्षीस मिळणे आनंदाचे आहे, पण फक्त तेवढेच महत्त्वाचे आहे का? रामनांसारखा एखादा वैज्ञानिक नोबेल पुरस्कार मिळवण्यासाठी संशोधन करतो का? कुसुमाग्रजांसारखा शब्दप्रभू ज्ञानपीठ पुरस्कारासाठी कविता लिहितो का? डॉ. अभय बंगांसारखा संशोधक - कार्यकर्ता महाराष्ट्रभूषण म्हणून आपला सत्कार व्हावा म्हणून गडचिरोलीसारख्या आड वाटेला जातो का? नक्कीच नाही. उत्तम कामाचा रस्ता विचारत पारितोषिके, पुरस्कार, सन्मान त्यांच्याकडे येतात.

प्रकल्पांचेही तसेच आहे. प्रकल्प ही शिकण्याची एक पद्धत आहे. वर्षभर प्रकल्प करताना आपण काय शिकलो हे तपासून पाहिले पाहिजे. तपासताना आपल्याला आपल्या कामातला आनंद दिसला, आठवला तर केवढे मोठे बक्षीस! प्रकल्प करण्याची सगळी प्रक्रिया तपासताना चार गोष्टींचा विचार करूया. पहिली म्हणजे आत्मपरीक्षण. स्वत:च आपण केलेल्या कामाची परीक्षा करावी. प्रकल्पाला सुरुवात करताना आपण काय उद्दिष्टे ठरवली होती? कोणते प्रश्न आपल्याला पडले होते? कोणत्या परिकल्पना (हायपोथेसिस) मांडल्या होत्या? त्यातले काय काय पूर्ण झाले? हे मागे वळून पाहिले पाहिजे. अडचणी कोणत्या आल्या? त्यावर उपाय कसे शोधले? कोणीतरी सांगितलेलं, लिहिलेलं सांगकाम्या पद्धतीनं केलं की स्वत:चं डोकं वापरलं? नुसतंच संकलन केलं की त्यावर प्रक्रिया केल्या? जे वाचलं, करून पाहिलं ते कितपत समजलं? माहितीचे कोणते स्रोत वापरले? खऱ्या-खोट्याची शहानिशा कशी केली? गटात काम करताना वाद किती झाले आणि भांडणे किती झाली? आपण खरेच काम केले की कामाचे नाटक केले? हे सारे स्वत:शिवाय चांगले कोण जाणणार? तेव्हा आत्मपरीक्षण म्हणजे **'मीच माझा परीक्षक'** या न्यायाने पहिले परीक्षण करावे.

नंतर क्रम येतो तो **मित्र-मैत्रिणींचा.** आपण प्रकल्प करत असताना त्यांनी पाहिलेले असते. काही जण आपल्याबरोबर सहभागी झालेले असतात. आपला

। अभिनंदन... पद्मश्री पुरस्कार श्री. अजित बजाज (खेळ- स्किइंग - दिल्ली)।
प्रायोजक – श्री. अमर परांजपे, सांगली

प्रकल्प कसा झाला; हे तेही आपल्याला सांगू शकतात. प्रकल्पातील जमलेल्या गोष्टी; चुकलेल्या गोष्टी आणि नवीन काय करता येईल या बाबतच्या त्यांच्या सूचना समजावून घेणे; हा आपल्या शिक्षणाचाच भाग असतो.

पण अर्थातच प्रकल्पाचे खरे परीक्षण आपले शिक्षक चांगले करू शकतात. आपल्या प्रकल्प मार्गदर्शकांनी परीक्षण केले तर ते म्हणायचे **अंतर्गत परीक्षण.** कारण मार्गदर्शक संपूर्ण प्रकल्पात तुमच्या बरोबर असतात. प्रकल्पाचा विषय तुम्हाला किती समजला आहे, ते त्यांना समजतेच. पण त्याचबरोबर तुमच्या स्वभावातले गुण-दोषही त्यांनी पाहिलेले असतात. तुमची मर्मस्थाने जशी त्यांना समजलेली असतात; तशी तुमची बलस्थानेही त्यांच्या लक्षात आलेली असतात. एखाद्या प्रश्नाचा पाठपुरावा करतानाची तुमची चिकाटी त्यांना कौतुकास्पद वाटते; तर कधी एखाद्या प्रयोगातील निरीक्षणांचा चटकन लक्षात न येणारा अर्थ तुम्हाला कळला तर त्यातील हुशारीला त्यांनी दाद दिलेली असते. प्रकल्प करताना ते तुमचे सहप्रवासी असले तरी परीक्षण करताना थोड्याशा तटस्थतेने ते तुमच्या प्रकल्पाकडे पाहात असतात. हे परीक्षण कोणत्या क्षमतांचे केले जाते. स्वावलंबन, प्रयत्नशीलता, शिष्टाचार यांसारख्या व्यक्तिगुणांबरोबर नियोजन कौशल्य, वेळेचे महत्त्व, व्यवस्थितपणा आणि गटात काम करण्याचे कौशल्यही ते तपासत असतात. त्याचबरोबर प्रकल्प करत असताना शास्त्रीय दृष्टी वापरली ना, नवनवीन शिकण्याची वृत्ती दिसली का आणि अभिनव कल्पना सुचण्याच्या प्रतिभेचे दर्शन झाले का, हेही तुमचे मार्गदर्शक बघत असतात.

या सगळ्यासाठी मार्गदर्शक वर्षभर तुमचे निरीक्षण करत असतात. यातील अनेक निरीक्षणांचे गुणांत रूपांतर करणे अवघड असले तरी त्यांच्या गुणात्मक नोंदी वहीत केल्या जात असतात. त्या आधारे त्यांनी वेळोवेळी दिलेले अभिप्राय आपण योग्य त्या



'पॉझिटिव्ह स्पिरीट'ने घेतो ना हे महत्त्वाचे! आपले मार्गदर्शक हे परीक्षण कशाच्या आधारे करतात याचा एक नमुना पुढे चौकटीत दिला आहे. तो जरूर वाचा.

प्रकल्पाचे अंतर्गत परीक्षण फार महत्त्वाचे असते. माझ्या मते त्याचे महत्त्व एकूण परीक्षणात ७०% तरी असले पाहिजे. पण परीक्षण तटस्थपणे आणि वस्तुनिष्ठतेने होण्यासाठी **बाह्य परीक्षण** ठेवले जाते. एखादे तज्ज्ञ प्राध्यापक त्यासाठी बोलावले जातात. प्रकल्प स्पर्धा असेल तर बाह्य परीक्षकांसमोर तुम्हाला प्रकल्पाचे सादरीकरण करावे लागते. ठरावीक वेळात तक्ते किंवा स्लाईडच्या मदतीने सादरीकरण कसे करायचे हे आपण आधीच्या लेखांमध्ये पाहिले आहे. बाह्य परीक्षकांचा खरा भर दोन मुद्द्यांवर असतो. पहिला म्हणजे तुमच्या प्रकल्पातील अभिनवता! तुम्ही प्रकल्प करत असताना केलेला वेगळा विचार त्यांना आकर्षित करत असतो. अयशस्वी प्रकल्पातसुद्धा वेगळेपण असेल तर ते परीक्षकांना आवडते. तुमची प्रतिभा, सर्जनशीलता आणि चौकटीबाहेर विचार करण्याची क्षमता ते तपासत असतात. त्याचबरोबर प्रकल्प विषयाचे तुमचे आकलन हा दुसरा मुद्दा असतो. प्रकल्प विज्ञान-गणित, भाषा अथवा सामाजिक शास्त्रांतला असो त्या त्या विषयातील मूलभूत आशय तुम्हाला कळला आहे ना, हे पाहिले जाते. बऱ्याचदा परीक्षकांनी विचारलेले काही प्रश्न प्रकल्पाशी थेट संबंधित नसतात. त्यामुळे तुम्हाला वाटते की परीक्षक काहीतरी भलतेच विचारताहेत. पण तसे नसते. अवघड विषयांवर प्रकल्प केलेल्या तुम्हाला त्या विषयांतली सोपी, सामान्य गृहितके, नियम आणि तत्त्वे माहीत आहेत ना, हे तपासले जाते. अर्थात ह्या दोन मुद्द्यांबरोबरच तुमची निवेदन शैली, हजरजबाबीपणा, मांडणीतला व्यवस्थितपणा आणि गटकार्य करत असताना वापरलेली कार्यशक्ती, हेही महत्त्वाचे मुद्दे आहेतच.

सोनसळी धुमाऱ्यात, नव्या आयुष्याचा भास।
ठोठावते दार पुन्हा असोशीचा रम्य ध्यास।।

परीक्षणाचे निकष

१. स्वावलंबन : * विषय स्वत:ला सुचला.
* प्रकल्पाच्या कामाचे नियोजन केले.
* अडचणींवर स्वत: उपाय शोधले.
* मदत नसतानाही काम केले.

२. प्रयत्नशीलता :
* न कंटाळता एखाद्या कौशल्याचा सराव केला.
* संदर्भ, माहिती मिळवण्यासाठी धडपड केली.
* करत असलेल्या कामात सातत्य ठेवले.

३. शिष्टाचार : * मार्गदर्शकांशी नम्रपणे बोललात.
* मुलाखतींसाठी पूर्वतयारी केली, वेळ पाळली.
* इतरांच्या कामात अडथळे आणले नाहीत.

४. नियोजन कौशल्य : * विषयाची निवड व कृती विचारपूर्वक ठरवली. * कामांचा योग्य क्रम लावला.
* नियोजनाचा आढावा घेऊन वेळोवेळी आवश्यक बदल केले. * वेळ वाया जाऊ नये म्हणून पर्यायी कामे तयार ठेवली.

५. व्यवस्थितपणा : * नोंदवहीत दिनांक, संदर्भ ग्रंथ इ. च्या कच्च्या नोंदी केल्या. * प्रकल्प धारिणीत आवश्यक कागद क्रमवार लावले. * प्रयोग झाल्यावर सामानाची आवराआवर केली.

६. गटकार्य : * गटचर्चेत विधायक भूमिकेतून सहभाग घेतला. * आपणहून इतरांची मदत मागितली व इतरांना मदत केली. * इतरांच्या मतांचा, सूचनांचा आदर केला.

७. वैज्ञानिक दृष्टी : * माहितीचे पृथ:करण केले
* कोष्टके, आलेख व आकृत्यांचा वापर केला
* सुसंगत निष्कर्ष काढला

८. प्रतिभा : * नवीन कल्पनांचा विचार केला.
* विविध पर्याय वापरून पाहिले.

९. शिकण्याची वृत्ती : * विषय समजून घेण्यासाठी वाचन केले. * इतरांवर दोष ढकलला नाही.
* सुसंगत विचार केला.

१०. विषय आकलन :
* विषयातील मूलभूत संज्ञा, शब्दार्थ, व्याख्या, सिद्धांत कळले आहेत.
* माहितीचा क्रम आणि संबंध कळला आहे.

११. निवेदन शैली :
* आत्मविश्वासाने माहिती सांगितली.
* संवाद करता आला.
* प्रश्नांची विचारपूर्वक उत्तरे दिली.

अर्थात या परीक्षणामध्ये अप्रत्यक्षरित्या तुम्ही केलेल्या कामाइतकेच तुमच्या व्यक्तिमत्त्वाचेच परीक्षण होत असते. त्यामुळे जे केले तेच सांगणे; आलेल्या अडचणी मोकळेपणाने मांडणे; आपण केलेले प्रयत्न परीक्षकांच्या नजरेसमोर आणणे; आपल्या प्रकल्पाचा वेगळेपणा परीक्षकांना समजेल अशी मांडणी करणे; आणि मुख्य म्हणजे बौद्धिक प्रामाणिकपणा जपणे हे महत्त्वाचे!

बऱ्याचदा परीक्षकांना तुमच्या 'फायनल प्रॉडक्ट'मध्ये जितका रस असतो त्यापेक्षा जास्त रस तुम्ही प्रकल्प करत असताना घडलेल्या प्रक्रियेत असतो. त्यामुळे प्रकल्प किती यशस्वी झाला हे अंतिम निष्कर्षाइतकेच वर्षभर केलेल्या प्रयत्नांवर अवलंबून असते. हे प्रयत्न, त्यातून झालेले तुमचे शिक्षण, तुम्ही स्वत:, तुमचे मित्र, तुमचे मार्गदर्शक आणि बाह्य परीक्षक यांच्या नजरेसमोर आले तर त्यातून मिळणारे समाधान हे कोणत्याही पारितोषिकापेक्षा मोठे असते. असे समाधान मिळण्यासाठी दरवर्षी छान छान प्रकल्प करा.

***

– प्रा. विवेक पोंक्षे
ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक केंद्र, विनायक भवन,
५१४ सदाशिव पेठ, पुणे –३०
vivek.ponkshe@jnanaprabodhini.org

। अभिनंदन...पद्मभूषण पुरस्कार श्री. धर्मेन्द्रसिंग देओल (सिनेसृष्टी, कला)।

'तुम्हीच संपादक व्हा !' हस्तलिखित स्पर्धा निर्णय

✻ मन:पूर्वक अभिनंदन ! ✻

प्रथम : 'बहर' - बाल शिवाजी मा. शाळा, अकोला
द्वितीय : १. 'अलगुज' - फाटक हायस्कूल, रत्नागिरी
(संयुक्त) २. 'फुलवा' - ल. आपटे प्रशाला, पुणे
तृतीय : 'रंग मनामनांचे'- ल. आपटे प्रशाला, पुणे
उत्तेजनार्थ : 'भारतदेशा' - ल. आपटे प्रशाला, पुणे,
'छोटे उस्ताद' - अंकुर विद्यामंदिर, भंडारा
'लहरी'- तात्यासाहेब सामंत विद्यालय, चाळीसगाव
विशेष गुणवत्ताप्राप्त : ▯ 'शब्दसुमनांजली' - दादामहाराज नाटेकर विद्यालय, चिखली
▯ **'ज्ञानयज्ञ'**- विवेकानंद विद्यालय, चोपडा
▯ **'गाज'**- तात्यासाहेब सामंत विद्यालय, चाळीसगाव

'तुम्हीच संपादक व्हा' ही हस्तलिखित स्पर्धा दरवर्षीप्रमाणे याही वर्षी 'छात्र प्रबोधन'तर्फे आयोजित करण्यात आली होती. पुण्यासह डोंबिवली, चोपडा, अकोला, भंडारा, चाळीसगाव, रत्नागिरी इ. ठिकाणच्या ७ वी ते १० वीमधील १९ गटांनी (सुमारे २०० विद्यार्थी) या स्पर्धेत भाग घेतला. सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मनापासून अभिनंदन!

हस्तलिखित कशाप्रकारे तयार करायचे? त्यात कोणकोणते वाङ्मयीन प्रकार हाताळावे? विषय कोणकोणते असावे? विषयाचे संपादन कसे करावे? संकलित साहित्य किती घ्यावे? इ. संपादन कौशल्ये शिकण्याची तुम्हाला या हस्तलिखित स्पर्धेच्या निमित्ताने संधी मिळावी हा आमचा आग्रह असतो. गटामध्ये विचार करून तुम्ही वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करावी, गटात एकी राखून हस्तलिखित वेळेत पूर्ण करावे ही अपेक्षा असते.

यावर्षीच्या हस्तलिखितांचे परीक्षण करताना वाङ्मयीन विविधता, मुखपृष्ठ, शीर्षक, हस्ताक्षर, आशय या सर्व बाबींवर मुलांनी चांगला विचार केला असल्याचे जाणवले. बऱ्याच प्रमाणात उत्तम हस्ताक्षरात केलेले शुद्धलेखन आनंद देऊन गेले. काही हस्तलिखितांमध्ये विषयांचे वैविध्य आहे तर काही हस्तलिखितांमध्ये विषयसूत्र एकच आहे. उदा. लक्ष्मणराव आपटे प्रशालेचे 'भारत देशा', 'फुलवा'. 'बहर' या बालशिवाजी माध्यमिक शाळेच्या, हस्तलिखितात तीव्र पाणी टंचाईच्या समस्येला हात घालणारा 'जलस्रोतांची आर्त हाक' हा लेख, विषय आणि मांडणीच्या दृष्टीने उत्तम झाला आहे.

कथा, कविता यांना चित्रांची चांगली जोड लाभल्यामुळे अंक देखणे झाले आहेत. 'ज्ञानयज्ञ' (विवेकानंद विद्यालय, चोपडा) व 'शब्द सुमनांजली' (दादामहाराज नाटेकर विद्यालय, चिखली) या हस्तलिखितांमधली प्रस्तावना दर्जेदार आहे. विशेष म्हणजे 'छात्र प्रबोधन'च्या धर्तीवर सुंदर अशा पानांखालील ओळी यामध्ये घातल्या आहेत. फाटक हायस्कूलच्या 'अलगुज' या हस्तलिखितामध्ये सदरांना दिलेली नावे व हस्ताक्षर अतिशय सुंदर, एकटाकी आहे. काही हस्तलिखितांच्या मुखपृष्ठाकडे विशेष लक्ष वेधले गेले. तर काहींचे अंतरंग उत्तम आहे. काही हस्तलिखितांमध्ये मात्र चित्रांचा अभाव जाणवला. ही स्पर्धा हे गटकार्य आहे. ते सर्वांनी मिळून करायचे असते. त्यात चित्रकार, लेखक, कवी, यांचा समावेश हवा. कल्पकतेनी हस्तलिखिताचा विचार केला तर हस्तलिखित उत्तम होईल, यात शंका नाही.

जास्तीत जास्त मुलांना लिहिते करण्यासाठी, त्यांच्यातील कलागुणांना वाव मिळावा म्हणून अशा नावीन्यपूर्ण स्पर्धा छात्र प्रबोधनतर्फे आयोजित केल्या जातात. पुढील वर्षी याहून अधिक गट या स्पर्धेत सहभागी होतील, या अपेक्षेत.

परीक्षक
डॉ. गीतांजली घाटे, शिल्पा कुलकर्णी

हस्तलिखितांची पारितोषिके देणाऱ्यांची नावे

१. **श्री. दिवाकर बाळकृष्ण बापट** (कै. बाळकृष्ण दत्तात्रय बापट यांचे स्मरणार्थ)
२. **सौ. ललिता लिखिते** (कै. शं. रा. देवळे यांचे स्मरणार्थ)
३. **श्रीमती निर्मला गोपाळ किराणे** (कै. गो. म. किराणे यांचे स्मरणार्थ)

वरील देणगीदारांनी दिलेल्या देणगीच्या ठेवींवरील व्याजातून हस्तलिखित स्पर्धेतील प्रथम तीन क्रमांकांची पारितोषिके देण्यात आली आहेत. अन्य सर्व पारितोषिके 'छात्र प्रबोधन' तर्फे देण्यात आली आहेत. सर्व यशस्वी स्पर्धकांना पुस्तकरूपाने ही पारितोषिके पाठवली आहेत. त्यांनी त्याची पोच पाठवावी.

कोऱ्या कोऱ्या कागदावरी, शब्द टपोरे उमटावे।
तशाच कोऱ्या आयुष्यावर भाष्य गोजिरे रेखावे।।

ज्ञान प्रबोधिनी, पुणे तर्फे सुट्टीतील शिबिरे

शिबिराचे नाव	दिनांक / वेळ	वयोगट	तपशील व शुल्क	विभाग–संपर्क
१. बालविकास शिबिरे (अनिवासी)	२३ ते २९ एप्रिल ७ ते १३ मे २१ ते २७ मे स. १२ ते दु. ५	७ ते १२ वर्षे मुले – मुली	विविध बौद्धिक क्षमतांना चालना देणारे खेळ, प्रकल्प, गटकार्य इ. **शुल्क रु. १५००/–**	प्रज्ञा मानस संशोधिका योगिता मणियार ०२०–२४२०७२०४ सुजाता होनप ९४२०१७८०२०
२. क्षमता संवर्धन शिबिर (अनिवासी)	२६ मे ते ३ जून सकाळी १२ ते दुपारी ५	८ वी ते १०वीत गेलेले मुले – मुली	बौद्धिक, सामाजिक, भावनिक कौशल्ये व अभ्यास कौशल्ये यांवर आधारित खेळ, प्रकल्प, व्याख्याने, गटकार्य इ. **शुल्क रु. १५००/–**	प्रज्ञा मानस संशोधिका योगिता मणियार ०२०–२४२०७२०४ सुजाता होनप ९४२०१७८०२०
३. विज्ञान शिबिर (निवासी)	१४ मे ते १८ मे	८ वी ते १० वी मुलांसाठी	विज्ञान प्रकल्प, प्रयोग, संस्थाभेटी, वैज्ञानिकांशी गप्पा, विज्ञानातील विविध कौशल्ये इ. **शुल्क. रु. १५००/–**	बुद्धिमत्ता संवर्धन केंद्र गीता साठ्ये ०२०–२४२०७१९४ प्रकाश रणनवरे ९८२३१५३९४८
४. जोडीकार्ये व साहससहल (निवासी)	मुले – ३० मे २ जून मुली – ४ ते ७ जून	८ वी ते १०वीच्या मुलामुलींसाठी छा. प्र.चे सभासद असणे आवश्यक. (सभासद नसल्यास रु. १८० भरून वार्षिक सभासदत्व घ्यावे.)	एप्रिल–मे महिन्यात दोघा–दोघांनी जोड्या करून दूरभाषवर संपर्क साधून विविध प्रकारची कामे समजावून घ्यायची व ती पूर्ण करायची. नंतर ३ दिवसांची किल्ल्यांवरची भटकंती, **साहस सहल – शुल्क रु. ७००/–** (७ कामे पूर्ण करणाऱ्यांना रु. १०० ची सवलत)	छात्र प्रबोधन २४२०७१७४/१७९
५. अभिक्षमता मापन व मार्गदर्शन	२० मार्चपासून पुढे मापनासाठी ३ तास व मार्गदर्शनासाठी १ तास पूर्वनोंदणी आवश्यक	१०वी व पुढील मुलामुलींसाठी	कल व क्षमता यांचे मापन व त्यानुसार कोणत्या शाखेत प्रवेश घ्यावा याबाबत वैयक्तिक मार्गदर्शन **शुल्क रु. ८००/–**	प्रज्ञा मानस संशोधिका ०२०–२४२०७१०६ २४२०७१४४
६. नेतृत्व संवर्धन शिबिर	युवकांसाठी – १४ ते १८ मे युवतींसाठी – २१ ते २५ मे स. १० ते संध्या. ७ (१ दिवस मुक्कामी सहल)	१२ वी ते एस. वाय. ची परीक्षा दिलेले युवक–युवती	नेतृत्वाला आवश्यक कौशल्यांच्या कार्यशाळा, गटकार्य, गटचर्चा, तज्ज्ञांचे मार्गदर्शन **शुल्क रु. २०००/–** (बाहेरगावच्यांसाठी निवासव्यवस्था केली जाईल. त्यासाठी जादा शुल्क रु. १०००)	नेतृत्व संवर्धन केंद्र महेन्द्र सेठिया ९४०४२२४७०५ राजीव हजिरनीस ९४२२३२१२६७

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर १२ चैत्र, शके १९३४, १ एप्रिल २०१२ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे–२ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे – ३० येथून प्रसिद्ध केले.

उत्तिष्ठत जाग्रत !

त्या तेजस्वी डोळ्यांमधली वीज अजुन सांगते
उत्तिष्ठत जाग्रत! बंधूंनो उत्तिष्ठत जाग्रत! ।। ध्रु. ।।

ऐन यौवनी मदन दाहुनी जे प्रलयंकर झाले
वेदान्ताच्या गूढ गुंजनी जे नवशंकर झाले
हिंदुधर्म अन् हिंदुदर्शने जगात गाजविली
मानवमात्रा बंधुत्वाची साद जये घातली
असुन विरागी नि:संगाचे जे स्वामी होते ।। १ ।।

अखिल विलासांसह नत होती यक्षभूमि पश्चिमा
मनी परंतु मायभूमितिल आर्तांची वेदना
आणि भुकेल्या श्वानास्तवही मोक्षाची हेळणा
हेच डोळुले शिणले होउनि बुद्धाची करुणा
मठबद्धांना मानवतेची शिकवित नवगीते ।। २ ।।

त्या डोळ्यांनी अनागताचा थेट वेध घेउनी
भारतभूच्या भवितव्याचे स्वप्न भव्य पाहिले
आत्म्याचे संगीत ऐकवुनि जडवादी दुनियेला
भारत विश्वगुरू करण्याचे कार्य अजुनि राहिले
त्या कार्याचा वसा घेउ या, तोच ध्यास ध्येय ते ।। ३ ।।

स्वामी विवेकानंद
शतकोत्तर सुवर्णजयंतीनिमित्त
त्यांच्या विचारांवर आधारित
गीतमाला – ४

'उठा! जागे व्हा! आपल्या ध्येयापर्यंत पोहोचल्याशिवाय थांबू नका!'
स्वामी विवेकानंदांनी आपल्या देशबांधवांना केलेल्या आवाहनाचं स्मरण कवी वाचस्पती अशोक निरफराके यांनी सुरुवातीला केले आहे. ऐन तारुण्यात विरागी वृत्ती अंगी बाणवून स्वामीजींनी वेदान्ताचा अभ्यास केला. शिकागो येथील सर्व-धर्म परिषदेत अखिल मानवजातीला स्वत:मध्ये सामावून घेणाऱ्या हिंदूधर्माची महती त्यांनी जगासमोर आणली. त्यानंतर कीर्ती, सन्मान यांच्या जोडीने अनेक भौतिक सुखे स्वामीजींच्या समोर आली; परंतु त्यात न रमता त्यावेळीही स्वामीजी मात्र आपल्या दीन, दु:खी देशबांधवांचं चिंतन करत होते. 'देशातील एक कुत्रा जरी भुकेला असेल तर त्यावेळी मोक्षाचा विचार करणं हे पाप आहे' असे ते म्हणत. निष्क्रियता दूर सारून, आपली भारतभूमी विश्वगुरू व्हावी यासाठी आपण प्रयत्न करायला हवा असे ते सांगत. त्यांचं हे स्वप्न पूर्ण करण्याचा ध्यास आपण सर्वांनी घ्यायला हवा !

स्वामी विवेकानंदांचे विचार आचरणात आणूया!... ४

आधी शरीर सतेज, सुदृढ बनवा, मगच मन सुदृढ, सुसंस्कृत बनेल, कारण मन हा शरीराचा अविभाज्य भाग आहे.

- जेवण जसे नित्याचे / सवयीचे असते तसाच व्यायामही आपल्या दिनक्रमाचा नित्य भाग असायला हवा. उदा. सूर्यनमस्कार, जोरबैठका, मैदानावरचे खेळ इ.
- मला न आवडणारा पण पौष्टिक असा एखादा पदार्थ आठवड्यातून एकदा मी निश्चयपूर्वक ग्रहण करीन.

सौर चैत्र, शके १९३४/ एप्रिल २०१२, पंजीकृत नियतकालिक (Registered Newspaper)
पंजीकरण क्रमांक (RNI NO.)MAHMAR/2000/5636 **घोषणापत्र क्रमांक :** (PHM/SR/201/VIII/2001)
L-2 / RNP / PNW/M / 94 / 2012 - 2014, **Posted at S.P. Post Office On 1st of Every Month.**

‘तुम्हीच संपादक व्हा !’

पुरस्कार प्राप्त हस्तलिखिते



सौर दिनदर्शिका शके १९३४		
	एप्रिल २०१२	चैत्र / वैशाख
र.	1	१२
सो.	2	१३
मं.	3	१४
बु.	4	१५
गु.	5	१६
शु.	6	१७
श.	7	१८
र.	8	१९
सो.	9	२०
मं.	10	२१
बु.	11	२२
गु.	12	२३
शु.	13	२४
श.	14	२५
र.	15	२६
सो.	16	२७
मं.	17	२८
बु.	18	२९
गु.	19	३०
शु.	20	३१
श.	21	वै. १
र.	22	२
सो.	23	३
मं.	24	४
बु.	25	५
गु.	26	६
शु.	27	७
श.	28	८
र.	29	९
सो.	30	१०

पत्त्यामध्ये वर्गणीचा कालावधी 12-7/**April 12 असल्यास तुमची वर्गणी संपली आहे, ती त्वरीत भरावी. पत्त्यामध्ये चुका असल्यास तातडीने कळवा.**

संपर्क पत्ता :
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०)२४२०७ १७४/१७९

या अंकाची किंमत : ₹ २०/–
वार्षिक वर्गणी : ₹ १८०/–
प्रकाशन दिनांक :
सौर १२ चैत्र, शके १९३४
१ एप्रिल २०१२

www.chhatraprabodhan.org
chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

प्रिय पोस्टमन,

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना !

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (⟶) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,

तुमचा–संपादक, छात्र प्रबोधन.

प्रति –